देशदूत
BEST OF LUCK
दहावी परीक्षेचा आज निकाल.
सर्व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे
हार्दिक अभिनंदन! - संपादक

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | धुळे | वर्ष २७ । अंक २२२ । सोमवार, दि. २७ मे २०२४ । पाने ८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

विद्यापीठात तरूणीचा विनयभंग

पुणे । सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात तरुणीचा विनयभंग केल्याप्रकरणी पुणे काँग्रेस एनएसयुआयचे प्रदेशसचिव अक्षय कांबळे याच्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सावित्रीबाई फुले विद्यपीठात अनेक मुलींचा मानसिक छळ करणं आणि त्रास दिला म्हणून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित तरुणीने व्हिडिओ शूट करून आपल्यावर झालेल्या अन्ययाबाबत माहित दिली आहे. तसंच आरोपीला लवकरात लवकर अटक करण्याची मागणी पोलिसांना करण्यात आली आहे.

संपादकीय

पाणीवापराच्या विवेकाचाच दुष्काळ

यंदाच्या वर्षी हंगामी पाऊस वेळेवर दाखल होण्याच्या अंदाजाने वातावरणात सुखद गारवा निर्माण केला. पण लोकांची ती भावना फोल ठरावी अशी आग सूर्य ओकतोय. देशाच्या आणि राज्याच्या अनेक भागात तापमानाने उच्चांक गाठला आहे. वाढत्या तापमानाबरोबर दुष्काळाचा फास अधिकाधिक घट्ट होत आहे. भविष्यात पाणी हे वादाचे कारण बनेल असे सांगितले जाते. त्याची चुणूक अनेक बाबतीत आढळते. कृष्णा नदीवरील महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील राजापूर बंधाऱ्यावर चोवीस तास पोलीस बंदोबस्त असल्याचे वृत्त माध्यमात प्रसिद्ध झाले. बंधाऱ्यातील पाण्यावरून दरवर्षीच्या उन्हाळ्यात वातावरण नेहमीच तंग असते. दोन्ही राज्यातील जमावात मारामाऱ्या, वाहने पेटवणे, हल्ले करणे अशा घटना घडतात. त्या तशा घडू नयेत व धरणावर हल्ले होऊ नयेत म्हणून पोलिसांचा खडा पहारा असतो असे त्या वृत्तात म्हंटले आहे. मुंबईत पाणी कपातीचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. नाशिक जिल्ह्यातील सहा धरणे कोरडी पडली आहेत. अन्य धरणे कोरडी पडण्याच्या मार्गावर आहेत. गंगापूर धरणातील जलसाठा खालावत असल्याने गाळमिश्रित पाणीपुरवठ्याची शक्यता वर्तवली जाते. अनेक गावांमधील बायाबापड्यांची पाण्याच्या शोधात भटकंती सुरु आहे. तरीही पाण्याविषयीचे शहाणपण का वाढत नसावे? पाण्याचा थेंब न थेंब साठवण्याची गरज व्यक्त होत असताना विशेषतः शहरी परिसरात पाण्याची उधळपट्टी सुरु असल्याचे ठिकठिकाणी आढळते. वाहने धुण्यासाठी नळीने पाणी मारले जाते. नळ सुरूच ठेवून भांडी धुणे, दाढी करणे, ब्रश करणे सुरूच आहे. सार्वजनिक ठिकाणी बऱ्याचदा नळ सुरूच असतात. त्यामुळे पाणी येण्याच्या वेळेत पाणी वाया जाते. पाणी शिळे झाले म्हणून हंडाभर पाणी आजही फेकून दिले जाते. उष्ट्या पाण्याचे अनेक सदुपयोग आहेत. जसे कि, झाडांना घालणे. पण तसे घडत नाही. पाण्याचे महत्व माणसांना अजूनही का कळत नसावे? पाणी हे जीवन आहे हा फक्त सुविचार नाही. अन्यथा पाण्यावरून किंवा पाणी भरण्यावरून पान २ वर

सुर्यदेव कोपला : दोंडाईचा परिसरात उष्माघाताने चार जणांचा मृत्यू

पोलीस यंत्रणेची माहिती, एकाची ओळख पटली

दोंडाईचा । शिंदखेडातालुक्यातील दोंडाईचा परिसरात उष्माघात सदृष्य आजाराने चार जणांचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिस यंत्रणेने दिली आहे. एका मयताची ओळख पटली आहे.

जिल्हाभरात उन्हाने कहर केला आहे. तापमानाने ४४ ते ४५ अंशाचा आकडा पार केल्याने जीवाची लाही-लाही होत आहे. घराबाहेर पडणे अशक्य होत आहे. पोलीस यंत्रणेने प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, दोंडाईचा शहर व परिसरात तापमानाचा पारा मोठ्या प्रमाणावर वाढल्याने दोंडाईचा शहर व परिसरात दोन दिवसात चार व्यक्तींचा उष्माघात सदृष्य आजाराने मृत्यू झालेला असून यात दोंडाईचा शहरातील भिक मागणारे, रेल्वे स्टेशन, बस स्टॅंड परिसरात इतरत्र फिरणारे बेवारस लोकांचा समावेश आहे. एकूण चार मृतांपैकी एकाची ओळख पटलेली आहे. तर अन्य तीन अनोळखीची ओळख अद्याप पटलेली नाही असे पोलिसांनी सांगितले.

उन्हाचा तडाका वाढलेला असल्याने सदर मृत्यू होत असल्याचा संशय असून शहर व परिसरातील भिकारी, बेवारस इसम हे आजारी दिसून असल्यास त्यांना उपचाराची गरज असल्यास नागरिकांनी पोलीस ठाण्याचा दूरध्वनी क्र. ०२५६६ २४४०२३ यावर संपर्क साधावा. तसेच समाजसेवी संस्था यांनी रेल्वे स्टेशन, बस स्टॅंड व इतर परिसरात पाणपोई सुरू करण्यासाठी पुढे यावे असे आवाहन दोंडाईचा पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक निलेश मोरे यांनी केले आहे.

नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, घराबाहेर पडतांना पाण्याची बाटली, डोक्याला बांधण्यासाठी रूमाल, टोपी सोबत घ्यावी. शिळे अन्न, बाजारातील उघड्यावरील अन्न खावू नये. उन्हात जास्त वेळ घालवू नये असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

दुपारी ११.३० ते ४ पर्यंत आडोसा घ्यावा, जसे छत्री, टोपी, झाडांची सावली, इमारतीची सावली किंवा आवश्यक नसल्यास बाहेर पडू नये. स्वत: ला बाधा पान २ वर

कामाशिवाय घराबाहेर पडू नका

दोंडाईचा शहरासह परिसरात तापमानाचा पारा वाढत असून नागरिकांनी सजग राहावे कामाशिवाय घराबाहेर पडू नये उष्माघात होण्याची शक्यता असून आपापली काळजी घ्यावी.

-नीलेश मोरे,
सहाय्यक पोलीस निरीक्षक

दिल्लीतही आगडोंब

आगीत रुग्णालयातील सात शिशूंचा होरपळून मृत्यू

नवी दिल्ली । गुजरातच्या राजकोटमध्ये एका गेमिंग झोनमध्ये लागलेल्या आगीत मोठी जीवितहानी झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे. राजकोटच्या घटनेत तब्बल २६ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. एकीकडे राजकोटमध्ये अग्नितांडव चालू असताना दुसरीकडे राजधानी दिल्लीतही शनिवारी रात्रीच्या सुमारास भीषण आगीची घटना घडली. दिल्लीच्या विवेक विहार परिसरातील न्यू बॉर्न बेबी केअर सेंटरला लागलेल्या आगीत सात नवजात अर्भकांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. तर ५ जणांना वाचवण्यात आले आहे. त्यांना दुसऱ्या रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

राजधानी दिल्लीत शनिवारी रात्री न्यू बॉर्न बेबी केअर सेंटरला आग लागल्याची माहिती अग्निशमन दलाला मिळाली. अग्निशमन विभागाचं पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. रविवारी पहाटेपर्यंत आग विझवण्याचे काम चालू होते. रात्री साडेअकराच्या सुमारास लागलेली ही आग पहाटे ४ च्या सुमारास आटोक्यात आली.

दरम्यान, या दुर्घटनेत सापडलेल्या पाच अर्भकांना नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, त्यातील एका अर्भकाचा उपचारांदरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे. या आगीसाठी नेमके काय कारण ठरले, याचा शोध सध्या घेतला जात असून शॉर्ट सर्किटचे प्राथमिक कारण दिले जात आहे.

रुग्णालयात मोठ्या प्रमाणावर ऑक्सिजन सिलिंडरचा साठा

दरम्यान, या बेबी केअर सेंटरमध्ये मोठ्या प्रमाणावर ऑक्सिजन सिलेंडर्सचा साठा करण्यात आला होता, अशी माहिती आता समोर येत आहे. आगीची घटना घडली, तेव्हा या सिलेंडर्सपैकी अनेक सिलेंडर्स फुटल्याची माहिती अग्निशमन अधिकारी अतुल गर्ग यांनी दिली आहे. या घटनेत बेबी केअर सेंटरच्या बाजूच्या इमारतीमध्येही आग पसरली होती. मात्र, तिथे कोणतीही जीवितहानी झालेली नसल्याचंही अग्निशमन विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

तसेच, रुग्णालयाला देण्यात आलेल्या परवानग्यांचीही चौकशी आता केली जात आहे.

धुळ्यात भरधाव ट्रकने युवकाला चिरडले

धुळे । शहरातील देवपूर भागातील एल.एम.सरदार हायस्कूलसमोर भरधाव ट्रकने दुचाकीस्वार युवकाला चिरडले. हा भिषण अपघात आज दुपारी सव्वा दोन वाजेच्या सुमारास झाला. हा अपघात परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून त्यात अपघाताची भिषणता दिसून येत आहे. दरम्यान देवपूर पोलिसांनी ट्रक चालकाला अटक केली आहे.

रोहित योगेश सुर्यवंशी (वय १८ रा. रामचंद्र नगर, धुळे) असे मयत युवकाचे नाव आहे. तो दुचाकीने बहिणीला देवपूरातील एसएसव्हीपीएस महाविद्यालयात सोडण्यासाठी गेला होता. तेथून दुपारी सव्वा दोन वाजता आग्रा रोडने घराकडे जात असतांना एल.एम.सरदार हायस्कूलसमोर दुचाकी घसरून तो रस्त्यावर पडला. त्याचदरम्यान मागून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने त्याला चिरडले. त्यात तो जागीच ठार झाला. अपघातानंतर काही अंतरावर ट्रकला पकडण्यात आले. तर घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी करीत रोष व्यक्त केला. अपघाताची माहिती मिळताच देवपूर पोलिस ठाण्याचे पोलिस पान २ वर

मोदी एकमेव, ज्यांचा देवाशी संबंध

नहान येथील जाहीर सभेत राहुल गांधींची बोचरी टीका

शिमला । लोकसभा निवडणूक अंतिम टप्प्यात आली आहे. येत्या १ जून रोजी शेवटच्या टप्प्यातील मतदान होणार आहे, त्यामुळे सर्वच पक्षांनी प्रचाराचा जोरही वाढवला आहे. याच पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते राहुल गांधींनी पंतप्रधान मोदींच्या मुलाखतीवरुन त्यांना जोरदार टोला लगावला. ते म्हणाले, आजकाल नरेंद्र मोदींच्या मुलाखती सुरू आहेत, ते चार चमचे बसवतात अन् ते प्रश्न विचारतात की, मोदीजी, तुम्ही आंबे कसे खाता? सोलून खाता की चोखून खाता? मग मोदीजी उत्तर देतात की, मला माहित नाही, सर्व काही आपोआप

घडते, देव मला मार्गदर्शन करतो. मी भारतातील एकमेव व्यक्ती आहे, ज्याचा देवाशी थेट संपर्क आहे. काँग्रेसने स्वातंत्र्यासाठी लढा दिला ज्या व्यक्तीचा देवाशी थेट संबंध आहे, त्याला संविधानाची काय गरज? ते थेट देवाशी बोलतात, असा टोलाही राहुल यांनी मोदींना लगावला.

हिमाचल प्रदेशातील नहान येथे झालेल्या जाहीर सभेत राहुल गांधी पुढे म्हणाले की, काँग्रेसच्या लाखो कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्यासाठी लढा दिला आणि जनतेच्या सोबतीने देशाला संविधान दिले. आपण खोलवर पाहिले तर संविधानाचे विचार हजारो वर्षे जुने आहेत. मात्र भाजपचे लोक या संविधानावर हल्ला करत आहेत. ते संविधान बदलणार असल्याचे उघडपणे सांगतात. प्रियांका गांधी काय म्हणाल्या? यावेळी प्रियंका गांधी यांनीदेखील सरकारवर ताशेरे ओढले. त्या म्हणाल्या, भारतात शेतकऱ्यांचा आदर करण्याची परंपरा आहे. पण मोदी सरकारने 'किसान सन्मान'ला केवळ आश्वासने दिली. हे सरकार ना शेतकऱ्यांचा पान २ वर

चाळीसगाव बसला नाशिकजवळ अपघात

नाशिक । चाळीसगाव एसटी बसचा भीषण अपघात घडला आहे. मुंबई-आग्रा महामार्गवरील पिंपळगाव बसवंत टोल नाक्यावर ही अपघाताची घटना घडली. एसटी बसने ट्रकला जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला. या अपघातात २७ प्रवाशी जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. सर्व जखमींना पिंपळगाव बसवंत येथील शासकीय आणि खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. संबंधित घटनेमुळे घटनास्थळी एकच खळबळ उडाली. एसटी बसचा ब्रेकफेल झाल्यामुळे ही अपघाताची घटना घडली अशी माहिती समोर येत आहे.

चाळीसगाव आगाराची एसटी क्रमांक एम पान २ वर

इंडिया आघाडी तीन कट रचतेय

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विरोधकांवर हल्लाबोल

घोसी । इंडिया आघाडीचे लोक त्यांचे मूळ तीन कट पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवत आहेत. एक म्हणजे संविधान बदलून भारतात धर्माच्या आधारावर आरक्षण असेल असे लिहिले जाईल. दुसरे म्हणजे, एससी, एसटी आणि ओबीसीचे आरक्षण रद्द करण्याचे आणि तिसरे म्हणजे मुस्लिमांना धर्माच्या आधारावर संपूर्ण आरक्षण देण्याची योजना असल्याचा हल्लाबोल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांवर केला.

देशातील लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी राजकीय पक्षांकडून जोरदार प्रचार

सुरु आहे. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही उत्तर प्रदेशातील घोसी येथे सभेला संबोधित केले. यावेळी नरेंद्र मोदींनी इंडिया आघाडीवर जोरदार हल्लाबोल केला. पूर्वांचल गेल्या १० वर्षांपासून देशाच्या पंतप्रधानांची निवड करत आहे आणि पूर्वांचल गेल्या ७ वर्षांपासून यूपीचे मुख्यमंत्री निवडत आहे, त्यामुळे पूर्वांचल हे सर्वात खास असल्याचे नरेंद्र मोदींनी सांगितले. घोसी, बलिया आणि सलेमपूरमधील लोक फक्त खासदार निवडत नाहीत, तर ते पंतप्रधान निवडतात, असे नरेंद्र मोदी म्हणाले. तसेच, समाजवादी पार्टीवरही नरेंद्र मोदींनी निशाणा साधला. समाजवादी पार्टीने नेहमीच षड्यंत्राखाली मागासलेला राहिला, मात्र आता माफियांसाठी अश्रू ढाळणाऱ्यांना पाय ठेवू देणार नाही, असे नरेंद्र मोदी म्हणाले. सर्व जातींनी आपापसात लढावे अशी इंडिया आघाडीची इच्छा आहे. राजपूत, ब्राह्मण, राजभर, दलित, कायस्थ या सर्वांनी आपापसात लढून कमकुवत व्हावे. तुम्हाला प्रश्न पडला पान २ वर

केळी भाव

नवती (१)	: 1310
नवती (२)	: 1160
पिलबाग	: ---
वापसी	: ---

मिश्किली

नियमबाह्य कामांसाठी आरोग्य मंत्र्यांचा दबाव

निलंबित आरोग्याधिकाऱ्याचे मुख्यमंत्र्यांना दिलेले पत्र व्हायरल

पुणे । महिला कर्मचाऱ्यांचा लैंगिक छळाचा आरोप आणि आर्थिक घोटाळ्याचा ठपका ठेवत पुणे जिल्हा परिषदेचे तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. भगवान पवार यांना निलंबित करण्यात आले आहे. मात्र या कारवाईनंतर भगवान पवार यांनी आरोग्य मंत्री तानाजी सावंतांवर आरोप करणारा लेटरबॉम्ब फोडला आहे. सावंत यांनी मला कात्रज कार्यालयात बोलावून नियमबाह्य टेंडरची कामे करण्यास सांगितली होती, त्याचबरोबर इतर खरेदी प्रकरणात दबाव आणला होता, असा आरोप भगवान पवार यांनी केला आहे. भगवान पवार यांनी यासंदर्भात थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवून तक्रार केली आहे. हे पत्र सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर विरोधी पक्षांमधील नेते

राज्य सरकारवर टीका करू लागले आहेत. तसेच त्यांनी थेट आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्यावर टीका केली आहे.

विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी भगवान पवारांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेलं पत्र एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर शेअर केलं आहे. या पत्रासह वडेट्टीवार यांनी लिहिलं आहे की, भ्रष्ट अधिकाऱ्यांचे लाड - प्रामाणिक अधिकाऱ्यांवर कारवाई? शिंदे सरकारच्या टेंडरबाज मंत्र्यांचा प्रताप! महायुती सरकारमध्ये फक्त टेंडर (निविदा) काढण्याची स्पर्धा असते. जे भ्रष्ट अधिकारी मंत्र्यांच्या आदेशाने नियमबाह्य काम करतात त्यांचे पूर्ण लाड पुरवले जातात. तर जे अधिकारी नियमबाह्य काम करत नाहीत त्यांचा महायुतीतील मुजोर आणि भ्रष्ट मंत्री कसा छळ करतात त्याचा मोठा पुरावा समोर आला आहे.

वडेट्टीवार यांनी म्हटले आहे की, पुणे महानगरपालिकेचे आरोग्य प्रमुख डॉ. भगवान पवार यांचं निलंबन करण्यात आले आहे. त्यांनी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना निलंबन मागे घ्यावे म्हणून पत्र लिहिले आहे. मंत्र्यांनी त्यांना बोलवून वारंवार नियमबाह्य काम करण्यासाठी दबाव टाकल्याचे पवारांनी पत्रात म्हटले आहे.

उत्तर महाराष्ट्रातील सर्व सहा जागा भाजपा जिंकेल

मंत्री गिरीश महाजन यांचा दावा

मुंबई । घोडामैदान समोर आहे. जळगाव

लोकसभेच्या जागेबाबतच्या बातम्या, निराधार गोष्टी आहेत. त्यामुळे आपण चार तारखेला भेटू. जळगाव आणि रावेर या दोन्ही लोकसभांमध्ये आमच्या उमेदवाराला सर्वात उच्चांकी आणि विक्रमी मत मिळतील. लिहून घ्या, उत्तर महाराष्ट्रातल्या महायुतीच्या सहाच्या सहा जागा विजय होतील. महायुतीच्या सर्वात जास्त जागा महाराष्ट्रातून निवडून येतील, असा दावा मंत्री गिरीश महाजन यांनी केला आहे.

गिरीश महाजन म्हणाले, नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान होणार आहेत. आम्हाला देशात स्पष्ट बहुमत मिळेल. मोठ्या मतांनी आमचे खासदार देशात निवडून येतील व पुन्हा नरेंद्र मोदी पंतप्रधान होतील. देशवासीयांनी नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करायचं ठरवला आहे, त्यानुसार तेच पंतप्रधान होतील, असंही गिरीश महाजनांनी म्हटलं आहे.

रामदेववाडीप्रकरणी कारवाई होणारच

रामदेववाडी अपघात प्रकरणी मयत कुटुंबीयांच्या आरोपावर बोलताना महाजन म्हणाले, ज्या दिवशी अपघात झाला त्या दिवशी मी रात्रभर जिल्हा रुग्णालयात होतो. माझे सर्व आमदार पदाधिकारी कार्यकर्ते हे रुग्णालयात होते. सकाळी मंत्री गुलाबराव पाटील हे सुद्धा होते. त्यामुळे मंत्र्यांनी दखल घेतली नाही. असा विषय नाही. मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस त्यांच्याशी बोललो. आम्ही मयत कुटुंबियांच्या वारसांना प्रत्येकी पाच पाच लाख रुपयांचा धनादेश देत आहोत. या प्रकरणात कोणाचाही राजकीय दबाव नाही. यात जो कोणी असेल त्याच्यावर निश्चितच कायदेशीर कारवाई केली जाईल. कुणाचीही हयगय केली जाणार नाही. आरोपीच्या रक्ताचे नमुने हे घेण्यात आलेले आहेत. बाहेरगावी पाठवले असतील त्यामुळे त्याला थोडा वेळ लागत असेल, असेही महाजन यांनी सांगितले.

पान १ वरुन ...

पाणीवापराच्या विवेकाचाच दुष्काळ

भांडणे आणि मारामाऱ्या झाल्या नसत्या. पाणी जपून वापरण्याच्या सवयीचा समाजात अभाव आढळतो. मग पाण्याचा पुनर्वापर आणि त्याचे संवर्धन फार दूरची गोष्ट ठरू शकेल. हंगामी पाऊस पडण्याला जाणती माणसे निसर्गाची कृपाच मानतात. त्याने सरासरी गाठण्यात सामान्य माणसांना कोणतेच योगदान द्यावे लागत नाही. पण पाण्याचा जपून वापर करणे आणि त्याची जिथेजिथे शक्य होईल तिथे उधळपट्टी टाळणे मात्र सामान्यांना त्यांच्यापुरते सहज शक्य आहे. त्यासाठी पाण्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलाची, पाण्याविषयीच्या त्यांच्या धारणा बदलण्याची मात्र नितांत गरज आहे. दुर्दैवाने सध्या त्याच्याच दुष्काळ मोठ्या प्रमाणात जाणवतो.

सूर्यदेव कोपला : दोंडाईचा परिसरात उष्माघाताने चार जणांचा मृत्यू

होऊ नये. म्हणून पाण्याचे योग्य प्रमाण शरीरात राखावे. थोडे-थोडे पाणी दीड दोन तासाचे अंतरात घेतल्यास शरीराचे सामान्य तापमान राखले जाते. स्वत: जवळ पाणी बाळगावे, पाणीदार फळे जसे की, कलिंगड, पपई, चिकू, ऊसाचा रस, किंवा ताक, लस्सी, लिंबू सरबत, कोकम सरबत याचा वापर केल्यास उष्माघात होण्यापासून संरक्षण होते. उन्हात फिरणे, थांबणे, काम करणे किंवा प्रवास करणे टाळल्यास आपल्या आरोग्याला बाधा येणार नाही हे सर्वांनी लक्षात घ्यावे. अशी प्रतिक्रिया वैद्यकीय अधीक्षक डॉ. भरत कुलकर्णी यांनी दै. देशदूतशी बोलतांना दिली आहे.

नागरिकांनी आपली काळजी घ्यावी

आजच्या घडीला अनेक राज्यात उष्माघाताचे प्रमाण खूपच वाढवलेले आहे. राज्यातील विशेष करून खान्देश भागातील तापमान ४५ डिग्री पर्यंत व कधी कधी त्याही पुढे गेलेले आहे. अशा परिस्थितीत नागरिकांनी आपली काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. लहान मुले व वृद्ध नागरिकांनी यांची काळजी घेणे व उष्मा पासून त्यांचे संरक्षण करणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.

-डॉ. भरत कुलकर्णी, वैद्यकीय अधीक्षक

धुळ्यात भरधाव ट्रकने युवकाला चिरडले

निरीक्षक धनंजय पाटील व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. तसेच ट्रक चालकाला ताब्यात घेत ट्रक देवपूर पोलिस ठाण्यात आणण्यात आला. याप्रकरणी ट्रक चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रोहितचा अपघाती मृत्यू झाल्याचे कळताच कुटूंबियांनी एकच आक्रोश केला. हे पाहुण उपस्थितांच्या डोळे देखील पाणावले होते. मयत रोहित याच्या पश्चात आई-वडील, दोन बहिणी असा परिवार आहे. एका बहिणीचे नुकतेच लग्न झाले. तर त्याचे वडील डीजेचे वाहन तयार करण्याचे काम करतात.

दरम्यान या अपघातामुळे शहरातून सर्रास व भरधाव होणारी जड वाहनांची वाहतूक, रस्त्यावरील अतिक्रमण आणि वाहतूकीचा प्रश्न चव्हाट्यावर आला आहे.

मोदी एकमेव, ज्यांचा देवाशी संबंध

आदर करते, ना त्यांच्या फायद्याचे बोलते. मोदी सरकारच्या काळात पेट्रोल आणि डिझेल महाग झाले, शेतीशी संबंधित गोष्टींवर जीएसटी लावण्यात आला. मोदी सरकारने तीन काळे कृषी कायदे आणले तेव्हा शेतकऱ्यांनी विरोध केला. शेतकरी दिल्लीबाहेर बसून राहिले, ७०० हून अधिक शेतकरी शहीद झाले, पण ते झुकले नाही. शेतकऱ्यांना दहशतवादी आणि देशद्रोही म्हटले, पण नरेंद्र मोदींनी त्यांचे एकदाही ऐकले नाही. यूपीमध्ये निवडणुका होणार असताना हे कायदे मागे घेण्यात आले.

चाळीसगाव बसला नाशिकजवळ अपघात

एच ४० एन ९८ १७ ही बस चाळीसगाव येथून कल्याणच्या दिशेने जात होती. या दरम्यान मुंबई-आग्रा महामार्गवरील पिंपळगाव बसवंत येथील टोल नाक्यावर १३ नंबर लेनवर ही एसटी भरधाव वेगाने आली. यावेळी या एसटी बसचे ब्रेक फेल झाले. त्यामुळे बसचालकाचे बसवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे बसने समोर उभ्या असलेल्या ट्रकला जोरदार धडक दिली. यात बसमध्ये असलेल्या जवळपास २७ प्रवाशांना गंभीर दुखापत झाली. या जखमी प्रवाशांना खाजगी आणि शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. घटनेमुळे प्रवाशांना मोठा धक्का बसला आहे.

एसटी बसेसची दुरावस्था

मुंबई-आग्रा महामार्गावर खान्देशाच्या दिशेला जाणाऱ्या आणि येणाऱ्या मार्गावर नेहमी ठिकठिकाणी एसटी महामंडळाच्या बंद झालेल्या गाड्या नेहमी बघायला मिळतात. या गाड्या रस्त्यातच धोका देतात. त्यामुळे प्रवाशांना प्रचंड मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. एसटीला लालपरी म्हटलं जातं. लालपरीचा प्रवास अनेकांना आवडतो. पण याच लालपरीची अवस्था बिकट झालीय. अनेक गाड्या या जुन्या झाल्याने लांबच्या प्रवासावेळी धोका देतात. त्यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल होतात. या जुन्या झालेल्या बसेसचं प्रशासनाला काही नियोजन करता येईल का? हा मोठा प्रश्न आहे.

इंडिया आघाडी तीन कट रचतेय

असेल की इंडिया आघाडीचा फायदा काय होईल? तर जेव्हा समाजातील लोक एकत्र नसतील तेव्हा तुमचे लक्ष खऱ्या मुद्द्यांवरून विचलित होईल, असे नरेंद्र मोदींनी सांगितले. विरोधकांच्या राम मंदिरात त्रुटी शोधायला लागले

नरेंद्र मोदी निवडणुकीच्या काळात इंडिया आघाडीचे लोक मंदिरांना भेटी देण्याचे नाटक करतात, पण ५०० वर्षांनंतर, जेव्हा आपल्या आस्थेचा इतका मोठा क्षण आला तेव्हा त्यांनी राम मंदिराला शिव्या द्यायला सुरुवात केली आणि त्यात त्रुटी शोधायला लागले. राम मंदिराच्या उभारणीमुळे हे लोक प्रचंड नाराज झाले होते. ज्याप्रमाणे शाहबानोचा निर्णय रद्द करण्यात आला, त्याचप्रमाणे राम मंदिराबाबतचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णयही रद्द करण्यात यावा, असा दबाव हे लोक सातत्याने आणत आहेत, असेही नरेंद्र मोदी म्हणाले.

नशिबाची परीक्षा

सोमवार २७/०५/२०२४

*** मिलन डे ***

६-४ | १५० १६९ २४० | १४० २३९ ५९० | सिंगल ६-७-३

जोड ६०-१४-७५-८३-४२

*** कल्याण बाजार ***

९-१ | १८० २८९ ३८८ | १४६ १२८ १०० | सिंगल ९-५-८

जोड ९०-३१-५६-७८-१२

*** मुंबई (मेन) बाजार ***

४-५ | १४९ ४४६ ४०० | १४० २३० ७८० | सिंगल ४-६-२

जोड ४०-३५-६९-१२-५८

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे. कोणीही दुरुपयोग करु नये मो.९९७५४७९८२६

चाळीसगांव शहर पोलिसांकडून गहाळ मोबाईल हस्तगत

■ चाळीसगाव। प्रतिनिधी -

चाळीसगांव शहर पोलिसांनी एकुण १२ मोबाईल अंदाजे किंमत २,१०,००० रुपयांचे मोबाईल संच हस्तगत करुन ते मुळ मोबाईल धारकांस दिनांक २५/०५/२०२४ रोजी परत करण्यात आले आहेत.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, चाळीसगांव शहर पोलिस स्टेशन हद्दीतील मागील व चालु वर्षी आजपावेतो बरेच मोबाईल गहाळ बाबत संबंधीत मोबाईल धारक यांनी तक्रार दाखल केलेल्या होत्या. सदर तक्रारीबाबत डॉ. महेश्वर रेड्डी सो, पोलिस अधिक्षक जळगांव, सौ. कविता नेरकर अप्पर पोलिस अधिक्षक चाळीसगांव, अभयसिंह देशमुख सहा.पोलिस अधिक्षक उपविभाग चाळीसगांव यांनी वेळोवेळी मासिक क्राईम मिटींग दरम्यान गहाळ मोबाईल हस्तगत करणे बाबत दिलेल्या सुचनावरुन मोबाईल धारकांनी पुरविलेल्या माहीतीच्या आधारे सायबर पोलिस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखा जळगांव यांचे तांत्रिक विश्लेषण करिता मदत घेवुन चाळीसगांव शहर पोलिसांनी एकुण १२ मोबाईल अंदाजे किंमत २,१०,००० किं. चे मोबाईल संच हस्तगत करुन ते मुळ मोबाईल धारकांस दिनांक २५/०५/२०२४ रोजी म कविता नेरकर अप्पर पोलीस अधिक्षक चाळीसगांव व अभयसिंह देशमुखं सो, सहा. पोलिस अधिक्षक उपविभाग चाळीसगांव यांचे हस्ते परत करण्यात आलेले आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनावरुन चाळीसगांव शहर पोलिस स्टेशनचे पोनि संदीप पाटील, पोका, संदीप भटु पाटील, पोकॉ शरद पाटील, पोकॉ नरेंद्र चौधरी, पोकॉ मनोज तडवी, पोना सचिन सोनवणे (सायबर पो. स्टे) पोना ईश्वर पाटील (स्था. गु. शाखा), पोका गौरव पाटील (स्था. गु. शाखा) अश्यांनी केली आहे.

वाघळी येथे उष्माघाताने २५ मेंढ्या दगावल्या

■ चाळीसगाव । प्रतिनिधी -

तालुक्यातील वाघळी शिवारात विठ्ठल सुदाम बोरकर राहणार -जामधरी ता.नांदगाव यांच्या मालकीच्या मेंढ्या ते चारण्यासाठी वाघळी शिवारात आले असता, आज दुपारी उष्माघाताने २५ मेंढया मृत्यु झाल्या माहिती मिळली आहे. या मेंढपाळाचे अंदाजे २ ते ३ लाखाची नुकसान झाले आहे.

या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे, आपल्या जिवंत मेंढ्यांचा डोळ्या देखत मृत्यू पाहून मेंढपाळाना अश्रू अनावरण झाले, घटनेची माहिती मिळताच भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष पोपट भोळे, मल्हार सेनेचे नाशिक विभाग अध्यक्ष गणेश जाने यांनी घटनास्थळी भेट दिली. तसेच प्रशासनाला पंचनामा करण्याची विनंती केल्याची माहिती मिळाली आहे .

सोयगाव तालुक्यात उष्माघाताचा दुसरा बळी

■ पाचोरा/सोयगाव । प्रतिनिधी -

सोयगाव सह तालुक्यात तापमानाने कहर केला आहे. शनिवारी दुपारी १७ वर्षीय युवतीचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची घटना घोसला ता.सोयगाव येथे घडली आहे. सुमित्रा सर्जेराव पवार (वय १७) असे उष्माघातमुळे मृत झालेल्या युवतीचे नाव आहे.

शुक्रवारी सदर युवती आई सोबत शेतात गेली होती शेतात तिने झाडाची सावली व ऊन्हात असे राहिल्यामुळे तिला शुक्रवारी सायंकाळी अत्यवस्थ वाटून उलट्या झाल्या होत्या. रात्री झोपल्यावर शनिवारी सकाळी तीचा झोपेतच मृत्यू झाला. शनिवारी सकाळी सदर युवती उठलीच नाही तिला तातडीने उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केले असता खासगी वैद्यकीय सूत्रांनी तिला तपासून मृत घोषित केले. सोयगाव तालुक्यात आठवडाभरापासून तापमानात वाढ झाली आहे त्यामुळे शुक्रवारी शेतातून घरी आलेल्या शेतकरी प्रकाश तराल (रा कवली) यांच्या पाठोपाठ शनिवारी घोसल्यात १७ वर्षीय युवतीचा उष्माघातामुळे मृत्यू झाला आहे. महसूल विभागाने या घटनेची नोंद केली असून तालुका आरोग्य विभागाचे पथक तातडीने घटनास्थळी सायंकाळी उशिरा घोसला येथे रवाना झाले होते दरम्यान सोयगाव तालुक्यात २४ तासात उष्मांघाताने सलग दुसरा मृत्यू झाला आहे. शनिवारी सोयगाव चा पारा ४४ अंशावर होता .त्यामुळे रस्ते सामसूम झाले तर गावागावात शुकशुकाट होता. दरम्यान सोयगाव तालुक्यात दोन दिवसात उष्मांघात चा हा दुसरा बळी झाला आहे.

सोयगाव तालुक्यातील घोसला गाव हे जळगाव जिल्ह्याच्या सीमेवर आहे त्यामुळे या गावात तापमानाची नोंद विक्रमी आहे सदर १७ वर्षीय युवतीचा मृत्यू हा नेमका कशाने झाला हे सांगता येणे सध्या कठीण आहे परंतु तिच्यात उष्माघाताच्या त्रासाचे लक्षणे जाणवत होते त्यामुळे उष्माघातामुळे तिला त्रास होऊन तिचा मृत्यू झाला असावा असाही संशय आहे, असे डॉ.गितेश चावडा, तालुका आरोग्य अधिकारी सोयगाव यांनी सांगितले.

खिरोदा येथे वादळामुळे ४२ लाखांचे नुकसान

■ खिरोदा,ता.रावेर। वार्ताहर

खिरोदा, जानोरी, चिचांटी, कळमोदा, सावखेडा शिवारात दि.२५ रोजी संध्याकाळी ६ ते७ वाजेच्या दरम्यान जोरदार वादळ व अवकाळी पाऊस यामुळे खिरोदा येथील अंदाजे ५६ शेतकऱ्याचे केळी बागेचे नुकसान झाले असून यात शासकीय नियमानुसार अंदाजे ९५ हेक्टर वरील केळीचे ४२ लाख रुपय पर्यंतचे नुकसान झाले आहे.

प्राथमिक अंदाजानुसार आज ३८ शेतकऱ्यांचे केळीचे नुकसानीचे पंचनामे खिरोदा मंडळ अधिकारी अनंत तलाठी निलेश पाटील, कोतवाल शांताराम कोळी मनोहर चौधरी, तसेच भरत महाजन, राहुल चौधरी, अतुल बोरोले, निळकंठ रामचंद्र चौधरी, नामदेव झोपे रुपाली राकेश पाटील, विनोद निवृत्ती नेहेते, निवृत्ती नेहते अमिना बुऱ्हाण तडवी, हेमंत काशिराम चौधरी, काशिनाथ रामभाऊ चौधरी, अनुपम चौधरी, मधुकर इंगळे, प्रदीप गाजरे, प्रफुल्ल पुंडलीक चौधरी, सोनाक्षी राहुल चौधरी, मनिषा किरण खाचणे, रामकृष्ण लोटू पाटील, गिरीष रवींद्र महाजन, विलास झोपे, ज्ञानदेव झोपे, प्रविण रामकृष्ण महाजन, वासुदेव चौधरी, सुधिर बळीराम चौधरी, पियुष होले इत्यादी शेतकऱ्यांचे केळी बागांचे नुकसान झाले आहे.

तसेच आ.शिरीष चौधरी यांनी सुध्दा शासनाकडे अतिउष्णता तापमानाचे नुकमान व केळीचे आताचे वादळीवारा व पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यानां तातडीने नुकसान भरपाई देण्याचे शासनास विनंती केली आहे.

जाहिर नोटिस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१. मिळकतीचे वर्णन :- तुकडी जिल्हा धुळे पोट तुकडी तालुका धुळे पैकी **मौजे सरवड** या गावचे शिवारातील मिळकत यांसी **गट क्रमांक व उपविभाग ३२९/४,** यांसी एकुण क्षेत्र ०१ हे. ५९ आर यापैकी श्री. भुषण रामकृष्ण भदाने (पाटील) यांचे मालकीचे व स्वतंत्र आणेवारी असलेले क्षेत्र ०० हे. ६२ आर यांसी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईटप्रमाणे.

उपरोक्त मिळकत **श्री.भुषण रामकृष्ण भदाने (पाटील)** यांच्या मालकीची व कब्जावहीवाटीची आहे. त्यांना सदर मिळकत रिलायन्स बीपी मोबिलीटी लि. या कंपनीस पेट्रोल पंप चालु करण्यासाठी दिर्घ मुदतीने भाडेतत्वावर दयावयाची आहे. त्यामुळे सदर मिळकतीचे टायटल व्हेरिफिकेशनकामी सदरची नोटीस प्रसिध्द केलेली आहे.

सबब सदरचे मिळकतीवर इतर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, अधिकार जसे, गहाण, दान, लिन, लिज, साठेखत, विसारपावती, बक्षिसपत्र, वाटणीपत्र, करार, कर्ज, तारण, कोर्ट वाद, पोटगी अगर इतर काहीही हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन **१५ (पंधरा)** दिवसांचे आत खालील पत्त्यावर आमचे कार्यालयात मुळ कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. विना दस्तऐवज अगर परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या व मुदतबाहय हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीनंतर वरील मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजुन टायटल व्हेरिफकेशन सर्टीफिकेट दिले जाईल.

हि नोटीस. तारीख: २५/०५/२०२४
आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली.

गणेश बंडुलाल राठी
ॲडव्होकेट
श्रीरामनगर, मु.पो.लासलगाव,
ता.निफाड, जि.नाशिक
मोबा.नं.९४०३८ ५४०११
पक्षकार,
श्री.भुषण रामकृष्ण भदाने (पाटील)

कल्याण

दि.	सोम	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
०८-०४ २०२४ १३-०४-२०२४	३४४४३७ ३८	२५३२२५ २५	२३८८५३ ५८	१७८३२० २९	६०६४०० ३७	३६६७७ २३
१५-०४ २०२४ २०-०४-२०२४	१११४६२ ७९०	२७९७०० १६०	३५५२७७ ६७९	९९८१०० १३७	३७०२०० ४५	२३०४५५ ६८०
२२-०४ २०२४ २७-०४-२०२४	५६०९ २३५६	२४४९८ ५७७	२५४२७ १४७	१६७८० ४६८	३५६७८ ८००	५६०२९ ३९०
२९-०४ २०२४ ०४-०५-२०२४	७७३९ ३८०	५६९२८ १३८	२३५८० १८९	३४६०९ १३६	१४०८५ ६८०	३९२४० २५७
०५-०५ २०२४ ११-०५-२०२४	१४२७७ २५०	५८२१९ ३३५	३५५४७ ३४७	३५७९९ १८०	६६०१८ ४९०	१५४४८ ७८९
१३-०५ २०२४ १८-०५-२०२४	२३९४ ३६९	१४४०९ ५६९	३४४५७ २४९	५६९६८ ४५७	२६५३७ ७९०	२३३०८ १९०
२०-०५ २०२४ २५-०५-२०२४	१५२६६ १५०	३४६६९ १११४	१३७०३ ११८	१३०२६ ५८९	३९१६९ २४०	३४४२७ १४७
२७-०५ २०२४ १-०६-२०२४						

मिलन डे

दि.	सोम	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि	रवि
०८-०४ २०२४ १४-०४-२०२४	२४२५६ २९	४४६०८ २६	२४५६९ २८	१४३७८ ५७	१३२१८ ५९	१३२६८ २९	●
१५-०४ २०२४ २१-०४-२०२४	२६४०९ ६८	३४४२० ५७०	७७२५८ १७७	१२८८५ ३०	५६८७ १६८	३७०४७ १६०	●
२२-०४ २०२४ २८-०४-२०२४	२४२७६ १७९	२३०७५ ००	३५६६८ ३५८	२२०६६ २४०	४४३१५ ११९	२६८०० २३५	●
२९-०४ २०२४ ०५-०५-२०२४	३४३३६ १३९	१८८९९ १२६	४६९५९ ३५७	३६८९९ ३७९	१७५६७ १६९	२६६६८ १७८	●
०५-०५ २०२४ ११-०५-२०२४	६०६४० ५८	१७७९९ १३५	११८३६ ६७०	६८२९८ १९९	९०९४० १२०	१२७७४ २६९	●
१३-०५ २०२४ १९-०५-२०२४	२७८२९ ३८	१४२९७ २३४	१६४९७ ३७९	४५६५७ १४०	३३०८४ १७०	५९३७९ ११५	●
२०-०५ २०२४ २६-०५-२०२४	१४६५१ ६९०	१६७७० ३४०	१३९४५ ७८९	२५४३७ ६७०	६८३५९ २६७	२३३८८ १७०	●
२७-०५ २०२४ १-०६-२०२४							●

मिलन नाईट

दि.	सोम	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
०८-०४ २०२४ १४-०४-२०२४	१२९१६ ३९९	१६७८० ५६७	२३५१० ६०	२८०४० ३४७	५७०६८ ३५८	१३३५९ १६८
१५-०४ २०२४ २१-०४-२०२४	४५४१५ १९९	४७०९९ २३८	४६७३० ४३९	६७३९० ४७८	७७३९९ ३६०	६६१०९ ५७८
२२-०४ २०२४ २८-०४-२०२४	१२९०६ ५९९	१७७१९ ६००	१७६९८ ४७८	१४३१८ ६६९	२४६५० १६८	१४१३६ १३८
२९-०४ २०२४ ०५-०५-२०२४	२७७८५ ४९	१५१९५ ३७९	२५३९६ ९००	३३२९६ १८०	२३०२५ १२९	२८०९० ४५०
०५-०५ २०२४ ११-०५-२०२४	४६८२८ १२९	४०४०० २४४	१३१७७ ४४९	२३४३९ २४७	२७८९९ ४७८	४७९११ १३७
१३-०५ २०२४ १९-०५-२०२४	४४३५५ १४०	१६४३७ ३४६	१६४६७ ८६०	५९४२० ५८९	३५८४० १५८	१४४७९ ५७५
२०-०५ २०२४ २६-०५-२०२४	५९४०० १२७	२४२५६ ६९०	३५८६९ ३४०	२४५७९ १६०	७८४४९ १३९	२४५७९ २५०
२७-०५ २०२४ १-०६-२०२४						

क्लासिफाईड

विकणे आहे

धुळे शहरातील नकाणे रोडवरील माहेश्वरी सोसायटी, प्लॉट नं.२४ येथील ८५० स्क्वे.फु. जागा विकणे आहे. संपर्क - रमेश गंगाराम साळवे मोबा. ७०६६५ ५९४५५ (दि.२७/५/२४)

शनिवार २५/०५/२०२४
मधुर नाईट -३३५-१८-९९०
धनलक्ष्मी नाईट -३४५-२८-२८८
मेन बाजार -
मिलन ना.-२४९-५७-२५०

रविवार २६/०५/२०२४
मधुर मॉर्निंग- ६९०-५४-१४९
मधुर डे- ७९९-५१-१४६
मधुर नाईट-
धनलक्ष्मी डे- २४०-६५-४५६
धनलक्ष्मी नाईट-
मेन बाजार -
कल्याण-
मिलन डे -
मिलन ना.-

दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ. पालवे ॲडमिट करा... ।। नका करु... पेशंटला सांगा....।। नका सांगू.... पेशंटला आणा.... ।। नका आणू.... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती.... सर्व सुविधांनी परिपूर्ण:- * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इजंक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरीबांसाठी फी मध्ये सवलत... तर आजच संपर्क :- ९५५२६१९७५२. डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (६४६२/व्ही.एम./०९/०१/२५)(CRINV-2324JL/CRG00555)

१००% व्यसनमुक्ती

* गॅरंटीने सोडवा. दारु + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव मो.९५५२६१९७५२, www.drpalve nashamuktikendra.in १००% रिझल्ट. (६४६३/व्ही.एम./०९/०१/२५) (CRINV-2324JL/CRG00554)

उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघे दुखी, चालता, बसता, उठता न येणे. जुनाट संधीवात / चिकन गुनीया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मुळव्याध, एचआयव्ही, भुक लागत नाही?, वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा - अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे, वरणगाव मो. नं. ९५५२६१९७५२ (६४६४/व्ही.एम./ ०९/०१/२५) (CRINV-2324JL/CRG00556)

देशदूत

धुळे आवृत्तीसाठी छोट्या जाहिरातील रु.५/-प्रतीशब्दाप्रमाणे स्वीकारल्या जातील. शब्दाची किमान मर्यादा १५ व कमाल मर्यादा ४०. सतत तीन दिवस दिल्यास चौथ्या, पाचव्या व सहाव्या दिवशी विनामूल्य. जाहिरातीच्या मजकूर दै. 'देशदूत'च्या छोट्या जाहिरातीच्या फॉर्मवर सुबक अक्षरात लिहून दै. 'देशदूत', 'देशदूत कार्यालय' राणी मेडीकल शेजारी, ग.नं. ६ ,धुळे ४२४००१. संपर्क धुळे-२३७९१४ फॅक्स २३८९१४.

सूचना

वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची 'देशदूत' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'देशदूत' वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

NEWS देशदूत धुळे



सोमवार, दि.२७ मे २०२४ | पान - ३

शॉर्ट न्यूज

बियाण्यांबाबत खात्री करा

■ धुळे । प्रतिनिधी

शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करतांना गुणवत्ता व दर्जाची हमी देणाऱ्या अधिकृत विक्रेत्यांकडून बियाणे खरेदी करावे. बनावट, भेसळयुक्त बियाणे खरेदी टाळण्यासाठी पावती घ्यावी. पावतीवर बियाण्यांचा संपुर्ण तपशील असावा. खरेदी केलेल्या बियाण्याचे वेष्टन, पिशवी, टँग, खरेदी पावती व त्यातील थोडे बियाणे पिकांची कापणी होईपर्यंत जपून ठेवावे. खरेदी केलेले बियाणे त्या हंगामासाठी शिफारस केल्याची खात्री करावी. भेसळची शंका दुर करण्यासाठी बियाण्यांचे पाकीटे सीलबंद असल्याची खात्री करावी, असे आवाहन जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी कावेरी राजपुत यांनी केले आहे.

हॉटेलमध्ये घरगुती गॅस

■ धुळे । प्रतिनिधी

शहरातील चाळीसगाव रोड पोलिस ठाण्याच्या हद्दीत घरगुती गॅसचा वापर केल्याप्रकरणी दोन व्यावसायीकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यात नयीम अख्तर मोहम्मद मुस्तफा शेख आणि मोसलीम जैनुल आबेदीन अन्सारी यांचा समावेश आहे. त्यांच्यावर पोलिसात नोंद झाला आहे.

तप्त उन, उकाडा, झळांनी धुळेकर त्रस्त

आरोग्याच्या तक्रारींमध्ये वाढ: भिकारी, बेघरांना जगणे झाले असह्य, अंगाची होत आहे लाहीलाही

■ धुळे । प्रतिनिधी

शहरासह जिल्हाभरात तप्त उन्ह, उकाडा आणि गरम झळांनी धुळेकर बेहाल झाले आहेत. याचा सर्वाधिक फटका भिकारी आणि रस्त्यावर राहणाऱ्या बेघरांना बसला आहे. दोंडाईचा शहरात गेल्या दोन दिवसात भिकारी व बेवारस अशा चार जणांचा उष्माघात सदृष्य आजाराने मृत्यू झाला आहे. तर जिल्हा सर्वोपचार रूग्णालयात देखील दररोज तपासाणीसाठी गर्दी होत आहे.

शहरासह जिल्ह्यात गेल्या आठ दिवसांपासून उन्हाचा तडाखा प्रचंड वाढला आहे तापमानाचा पारा ४३ ते ४४ अशांवर स्थिरावलेला असून आज तापमान ४२.०० अंश सेल्सीअस नोंदविण्यात आले. तर किमान तापमान २५.४ इतके होते. तर आर्द्रता सकाळी ८५ तर दुपारी २९ इतकी होती. त्यामुळे उकाडा प्रचंड वाढलेला होता. सकाळी ९ वाजेपासूनच उन्हाचे अंगला चटके बसत होते. दिवसेंदिवस तापमानाचा पारा वाढत



असल्याने दुपारी वर्दळीचे रस्ते निर्मनुष्य दिसू लागले आहेत. कमी जास्त होणाऱ्या तापमानामुळे धुळेकर नागरीक चांगलेच त्रस्त झाले आहेत. रखरखत्या उन्हामुळे अंगाची काहिली होत असून मे हिटमुळे नागरिक अक्षरश: हैराण झाले आहेत. त्यामुळे दुपारी १२ वाजेपासूनच वर्दळीचे रस्ते ओस पडत आहेत. सकाळपासूनच उन्हाची दाहकता जाणवत असून रात्री ९ वाजेपर्यंत झळा लागत आहेत. नागरिक शक्य तेवढी कामे लवकर आटोपून घराकडे परतत असल्याने १२ ते ५ वाजेपर्यंत रस्त्यावरील वर्दळ कमी होत असून शहरात अघोषित संचारबंदीसारखी स्थिती दिसून येत आहे.

शरीराला थंडावा मिळावा म्हणून शीतपेयांना मागणी वाढली आहे. दुपारी आणि सायंकाळी शीतपेय स्टॉलवर आता गर्दी होत आहे. उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी टोप्या, उपरणे, बागायती रुमाल, गॉगल्सचा वापर वाढला आहे. दुपारी घराबाहेर निघणे अशक्य झाले आहे. बहुतांश जणांकडे बागायती मोठ्या आकाराचे रुमाल दिसू लागले आहेत. उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे दुपारी त्यात अधिक भर पडत आहे. परिणामी धुळेकर नागरीक शक्यतो घराबाहेर दुपारी निघत नसल्याने रस्ते निर्मनुष्य दिसत आहेत. ग्रामीण भागात देखील उन्ह चांगलेच तापत असल्याने शेती कामावर विपरित परिणाम झालेला दिसून येत आहे.

आरोग्याच्या तक्रारींमध्ये वाढ– शहरात वाढलेल्या तापमानाचा तडाख्यामुळे आरोग्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. तीव्र उन्हामुळे अस्वस्थपणा, थकवा, शरीर तापणे, अंगदुखी, डोकेदुखी, मळमळ ही लक्षणे आढळून येत असल्याने दवाखान्यांमध्ये गर्दी वाढली आहे. काळजी घेण्याचे आवाहन प्रशासाकडून करण्यात आले आहे.

पाच जणांचा मृत्यू, कारण अस्पष्ट

जिल्ह्यात गेल्या दोन ते तीन दिवसात पाच ते सहा जणांचा अचानक त्रास होवून उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. यात काही जण चक्कर येवून पकडल्याने व बेशुध्दास्थेत मिळून आले होते. त्यांच्या मृत्यूचे कारण अस्पष्ट असून उष्माघात सदृष्य आजाराने त्याचा मृत्यू झाल्याचे बोलले जात आहे. याबाबत संबंधीत पोलिसात नोंद झाली आहे.

मृतदेहांचा आकडा वाढला– धुळे शहरातील श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाच्या शवागारात दररोज सरासरी ४-५ मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी दाखल होत आहेतत. मात्र, हा आकडा अचानकपणे वाढला असून काल तब्बल दहा मृतदेह पीएमसाठी दाखल झाले होते.

दोंडाईचात विशिष्ट बीएलओची नेमणुकच संशयास्पद

जीवंत व्यक्तीला दाखविले मृत; भाजपाची तक्रार

■ दोंडाईचा । प्रतिनिधी

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत मतदार याद्यांसाठी तहसीलदार सपकाळे यांनी बीएलओ नेमतांना दुजाभाव केला असून विशिष्ट बाहेरगावांहुन आलेले बीएलओ जास्त प्रमाणात नेमले गेल्याने त्यांनी वस्तुनिष्ठ माहिती न घेता जीवंत व्यक्तींना मृत दाखवून त्यांचे नाव मतदार यादीतून वगळले असून एकाच कुटुंबातील व्यक्तीची नावे शहरातील वेगवेगळया दुरवरच्या बुथवर विभागली जाणे शिवाय दोंडाईच्यात विशिष्ट धर्माच्या बीएलओची नेमणुक मोठया प्रमाणावर केली गेल्याने त्यांनी दुसऱ्या धर्माच्या मतांना वगळून देणे, त्यांची नावे वेगवेगळया ठिकाणी विभागणे असे प्रकार केल्यामुळे याचा परीणाम मतदानाच्या टक्केवारी झाल्याचा आरोप भाजपाचे शहराध्यक्ष प्रविण महाजन यांनी केला आहे.

शहरात नेमण्यात आलेल्या बीएलओमुळे हा प्रकार झाल्याचे भाजपाचा आरोप आहे. याबाबत उद्या दि.२७ रोजी जिल्हाधिकारी तथा निवडणुक निर्णय अधिकारी यांची भेट घेवून याची तक्रार करण्यात येणार असल्याची माहिती भाजपाचे शहराध्यक्ष महाजन यांनी दिली आहे.

याबाबत प्रविण महाजन यांनी दिलेल्या माहितीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या वेळी मतदारांची नावे ज्या वॉर्डात राहतात तिथेच असतात मात्र लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत मात्र ती विखुरलेली असतात, त्यामुळे एकाच कुटुंबातील व्यक्ती वेगवेगळया ठिकाणी मतदानाला जाण्यासाठी कंटाळा करतात, वास्तवित पाहता दोंडाईचा शहरातील एका टोकापासून दुसऱ्या टोकाचे अंतर हे ४ ते ५ कि.मी. पर्यंत आहे, सर्वसामान्य व्यक्ती मतदानासाठी एवढया दूर पायी चालण्याचा कंटाळा करतो त्याचा परीणाम थेट मतदानाच्या टक्केवारी होत असतो, एकाच व्यक्तीची दोन ते चार ठिकाणी नावे असल्याचे दिसून आले त्यामुळे केवळ मतदारयादीचा फुगवटा झाल्याचे दिसून आले, शिवाय दोंडाईचा शहराच्या मतदाराचे नाव ३० ते ४० कि.मी अंतरावरील गावांमध्ये दिसून आले त्यामुळे बरेच व्यक्ती मतदानापासून वंचित राहिल्याचे श्री.महाजन यांचा आरोप आहे.

यामध्ये शिंदखेडा तहसिलदार ज्ञानेश्वर सपकाळे यांनी बीएलओंना मतदार यादीबाबत कुठल्याही सुचना दिल्या नाहीत शिवाय बीएलओची नेमणुकच संशयास्पद असल्याचे भाजपाचे म्हणणे आहे. त्यामुळे याची चौकशी करून तहसिलदार सपकाळे यांच्यासह बीएलओवर कारवाई करावी अशी मागणी प्रविण महाजन यांनी केली आहे.

टँकरची संख्या दहावर, १६५ विहिरींचे अधिग्रहण

■ धुळे । प्रतिनिधी

जिल्ह्यात यंदा तापमानाने पंचेचाळीशी गाठली आहे. त्यामुळे जलसाठ्यामध्ये प्रचंड घट झाली असून पाणीटंचाईच्या झळा देखील तीव्र होत आहेत. जिल्हयातील टँकरची संख्या दहावर पोहचली आहे.

टंचाईग्रस्त गावांसाठी १६५ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. त्यामुळे ग्रामस्थांना काहीसा आधार मिळाला आहे. जिल्हयातील पाणीटंचाई वाढत असून अनेक गावातील पाणी पुरवठ्याचे स्त्रोत आटले असून अनेक अनेकांनी तळ गाठला आहे. त्यामुळे चार ते पाच दिवसाआड पाणीपुरवठा करण्याची वेळ आली आहे. काही गावांमध्ये आठ ते पंधरा दिवस नळांना पाणी येत नसल्याची भयावह स्थिती निर्माण झाली आहे. ज्या गावांमध्ये पाणीपुरवठ्याचे सर्वच स्त्रोत आटले आहेत. त्या ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करण्याची मागणी केली जात आहे. यामुळे टँकरसाठीचे प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे सादर केले जात असून दिवसेंदिवस टँकरच्या प्रस्तावांची संख्या देखील वाढत आहे. जिल्हा प्रशासनाने दहा गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्याचे आदेश दिले आहेत. त्याठिकाणी ग्रामस्थांना टँकरद्वारे पाणी मिळत आहे. परंतु, टँकरच्या पाण्यावर गावाची तहान भागत नसल्याचे चित्र दिसत आहे. जिल्हा प्रशासनाने मान्यता दिल्यानंतर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने १६५ विहीरी विविध गावांसाठी अधिग्रहित केल्या आहेत. अशा खासगी विहिरीतून पाणीपुरवठा केला जात आहे. उन्हाची तीव्रता लक्षात घेता अधिग्रहित करण्यात आलेल्या विहिरी किती दिवस तारतील हा देखील प्रश्न आहे. त्यामुळे यंदा वेळेवर पाऊस आल्यास पाणी प्रश्न सुटण्यास मदत होईल.

स्ट्राँग रूमला कडेकोट बंदोबस्त, जिल्हाधिकाऱ्यांनी केली पाहणी

■ धुळे । प्रतिनिधी

धुळे लोकसभा मतदार संघातील मतदान यंत्र शहरातील देवपूर नगावबारी परिसरातील शासकीय गोदामात असलेल्या स्ट्राँग रूममध्ये ठेवण्यात आले असून त्यात स्ट्राँग रूमला सील करण्यात आले आहे. तेथे कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिनव गोयल यांनी स्ट्राँग रूमची पाहणी करून आढावा घेतला.

यावेळी पोलिस उपअधिक्षक एस.ऋषीकेश रेड्डी, उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मतदान केंद्र ठेवलेल्या शासकीय धान्य गोदाम येथील स्ट्राँग रूमला भेट देवून तपासणी, देखरेख व निगराणी करण्यासाठी जिल्हाधिकारी गोयल यांनी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. या अधिकाऱ्यांनी ३ जुनपर्यंत रोज सकाळी व सायंकाळी तेथे भेट द्यायची आहे. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राहुल जाधव, सीमा अहिरे, महेश जमदाडे, उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी गंगाराम तळपाडे, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, उपजिल्हाधिकारी रोहन कुवर, जिल्हा पुरवठा अधिकारी महेश शेलार यांचा समावेश आहे.

मनपा प्रशासनाकडून नालेसफाईचा दिखावा

उबाठा शिवसेनेच्या पाहणीत उघड; कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा मागणी

■ धुळे । प्रतिनिधी

शहरात येत्या दोन ते तीन दिवसात मान्सूनचे आगमन होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आलेल असतांना सुद्धा मनपा प्रशासनाकडून शहरातील नाल्यांची थातूरमातूर सफाई दाखविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. आज उबाठा शिवसेना पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्षात पाहणी केल्यानंतर ९० टक्के नालेसफाई झालेली नसल्याचे दिसून आले. मग फक्त लाखो रुपये बिल काढण्यासाठीच टेंडर काढण्यात येते का असा सवाल शिवसेना विधानसभा संघटक ललित माळी यांनी केला आहे.

शहरातील अनेक नाल्यांमध्ये काटेरी झुडपे वाढलेली आहेत. ते काढण्यासाठी साधे जेसीबी सुद्धा पाठविण्यात आले नाही अशी नागरिकांची तक्रार आहे. तसेच अनेक खुल्या जागांमध्ये, रस्त्यावरील खड्यांमध्ये पावसाचे पाणी तुंबुन तेथे मोठ्या प्रमाणात अस्वच्छता झाल्याने परिसरातील नागरिकांना साथीच्या रोगांना सामोरे जावे लागते. कचरा व नाले सफाईच्या नावाने महापालिकेत प्रत्येक वर्षी लाखो, करोडो रूपयांची बिले मागील पाच वर्षांपासून सातत्याने काढण्यात येत आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र केवळ दिखाऊ स्वरूपाची कचरा व नाले सफाई केल्याचे दाखवुन लाखो रूपयाचा भ्रष्टाचार केला जात आहे. मात्र आगामी काळात शिवसेना शहरातील परिसरातील कचरा व नाले सफाई करून घेण्याचा प्रयत्न करणार आहे तसे न झाल्यास शिवसेना आंदोलन करेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

पावसाळ्यात नियमित येणारे साथीचे रोग जसे डेंग्यु, मलेरीयाचा प्रभाव कमी अथवा नियंत्रित राहण्यासाठी शासनाच्या मार्गदर्शक नियमान्वये खुल्या जागेमध्ये काटेरी झुडपे काढण्यासह सफाई करणे तसेच नाले सफाई करणे व अथवा रोग नियंत्रणाच्या योग्य त्या दक्षता घेण्यास प्रशासनास भाग पाडणार असल्याचे यावेळी ललित माळी यांनी सांगितले. तसेच पावसाळ्यापूर्वी स्थायी व अस्थायी खड्ड्यांची नोंद करून. ते ताबडतोब भरावे.कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर ताबडतोब कारवाई करावी अशी मागणी शिवसेनेचे विधानसभा संघटक ललित माळी, विभाग प्रमुख रवींद्र बिलाडे, मीना ठाकुर, रुपाली बुवा, अनिता बिलाडे, गिरासे, विलास ठाकरे, गौरव ठाकरे, दिनेश कापडे, तलाठी आप्पा, वाघ गुरूजी ,बंटी पाटील, पप्पु नागरे आदींनी केली आहे.

वन्यजीव गणनेत दिसले मोर, हरण, बिबटया

■ धुळे । प्रतिनिधी

शहरानजीक असलेल्या लळींग वनक्षेत्रात बुद्ध पौर्णिमेनिमित्त वन विभागातर्फे वन्यजीवांचे निरीक्षण करण्यात आले. यासाठी वन अधिकारी व कर्मचारी रात्रभर मंचावर बसून होते. त्यात मोर, हरण, बिबटयासह अन्य वन्यजीव आढळून आले. वन विभागातर्फे याबाबतच्या नोंदी घेण्यात आल्या.

वन विभागातर्फे दरवर्षी बुद्धपौर्णिमेनिमित्त वन्यजीव गणना केली जाते. यंदाही हा उपक्रम राबविण्यात आला. त्यासाठी लळींग वनक्षेत्रात निरीक्षणासाठी तीन ठिकाणी मंच उभारण्यात आले होते. सूर्यास्तानंतर रात्री कधीही वन्यजीव तहान भागवण्यासाठी पाणवठ्याजवळ येतात. त्यामुळे वन्यजीव ज्याठिकाणी येतात त्याच ठिकाणी मंच तयार करण्यात आले होते. वन परिक्षेत्र अधिकारी भूषण वाघ, वनपाल नितीन सांगळे, वन्यजीवप्रेमी अमोल पाटील, पाच वनरक्षक व इतर कर्मचारी मंचावर रात्रभर थांबून होते. मध्यरात्री पाणी पिण्यासाठी ७ हरणांचा कळप तसेच पहाटे सहा मोर आले होते. मध्यरात्री पाणवठयावर बिबटया आला. ससा, तरस, कोल्हा, साळींदर, घुबड, रानमांजर, माकड अधूनमधून दिसले. याबाबतच्या नोंदी घेण्यात आल्या. अनेक ठिकाणी कॅमेरे लावण्यात आले होते. सकाळी काही ठिकाणी बिबटया व इतर वन्यजीवांचे पायांचे ठसे दिसून आले.

थोडक्यात...

युएचकरोडपती विद्यालयातील ८० टक्के पेक्षा जास्त गुण मिळालेले विद्यार्थी

पारोळा | वार्ताहर

लोकेश चव्हाण साई बडगुजर आदित्य काळमेख

भावेश भालेराव श्रुती चांदवडे आकाश सौदागर

युएचकरोडपती विद्यालयातील एचएससी परीक्षेत ८० टक्के होऊन अधिक गुण मिळवलेले गुणवंत विद्यार्थी १) लोकेश अर्जुन चव्हाण ८८.५० टक्के, २) साई विजय बडगुजर ८७.३३टक्के, ३) आदित्य राकेश काळमेख ८६.६७ टक्के, ४) भावेश सुदाम भालेराव ८५.३३ टक्के, ५) सृष्टी प्रमोद चांदवडे ८४.८३ टक्के, ६) आकाश रवींद्र सौदागर ८४.६७ टक्के, ७) लोकेश संभाजी बडगुजर ८३.८३ टक्के, ८) सृष्टी शरद पाटील ८३.६७ टक्के, ९) मनीष विजय पाटील ८३.५० टक्के, १०) रोहित प्रवीण बडगुजर ८३.१७ टक्के, ११) ऋषभ पराग बडगुजर ८२.८३ टक्के, १२) ऋग्वेद शरद शिरोळे ८२.८३ टक्के, १३) आदिनाथ निलेश गुडस्कर ८२.५० टक्के, १४) शैलेश नाना पाटील ८२.३३ टक्के, १५) प्रशांत प्रकाश चव्हाण ८२.१७ टक्के, १६) योगिनी मोहन चौधरी ८२.१७ टक्के, १७) हरिचंद्र सुरेश पाटील ८१.६७ टक्के, १८) प्राजक्ता संदीप चव्हाण ८०.१७ टक्के मिळाले आहेत. त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सरकारी दवाखान्याजवळ मोटारसायकलच्या डिक्कीतून चोरट्यांनी पन्नास हजार लांबविले

अमळनेर | वार्ताहर

सरकारी दवाखाण्याजवळ लावलेल्या मोटरसायकलच्या डिक्कीतून अज्ञात चोरट्यानी ५० हजार रुपये लांबवल्याची घटना २५ रोजी सकाळी सव्वा दहा वाजेच्या सुमारास घडली.

प्रवीण पंडित नेरकर वय ३२ रा उंदिरखेडा ता पारोळा हा कलर काम करणारा त्याची मोटरसायकल क्रमांक एम एच १९ ईएफ ४८२९ वर अमळनेर आला. त्याच्या मोटरसायकलच्या डिक्कीत ५० हजार रुपये होते. काम आटोपून तो गांधलीपुरा भागातील वेश्यावस्तीकडे आला. मोटरसायकल सरकारी दवाखाण्याजवळ हँडल लॉक करून तो वेश्यावस्तीकडे गेला. तिकडून १०:३५ वाजता परत आला असता त्याला त्याची मोटरसायकलची डिक्की उघडी दिसली. त्याचे ५० हजार रुपये कोणीतरी चोरून नेल्याचे उघडकीस आले. अमळनेर पोलीस स्टेशनला फिर्याद दिल्यावरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास हेडकॉन्स्टेबल अशोक साळुंखे करीत आहेत. दरम्यान पोलीस निरीक्षक विकास देवरे व तपास पथकाने या भागातील लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे तपासून पाहिले असता गांधलीपुरा भागातीलच स्थानिकानी डिक्कीतील पैसे काढल्याचे दिसून आले.आरोपी निष्पन्न होताच पोलिसांनी त्यांना पकडण्यासाठी गेले असता आरोपी फरार झाले. लवकरच आरोपीना पकडण्यात येईल असे पोलिसांतर्फे सांगण्यात आले.

संतांकडून देवालाही हिणवण्याची आगळी वेगळी प्रथा

अमळनेर | प्रतिनिधी

अमळनेरचा संत सखाराम महाराज यात्रोत्सव म्हणजे सर्व जाती धर्माच्या लोकांना प्रतिनिधित्व व योग्य सन्मान देऊन साजरा होणारा उत्सव, मानवतेचा संदेश देणारा, निस्सीम भक्तीचा, आनंदाचा सोहळा, आरोग्याची काळजी घेणारा, गरिबांना मदत करणारा यात्रोत्सव ! वैशाख पौर्णिमेला संत सखाराम महाराज पालखी सोहळा संपन्न झाला. सकाळी आठ वाजेपासून ते रात्री साडे दहा वाजेपर्यंत तब्बल १४ तास पालखी मिरवणूक सुरू होती.

संत सखाराम महाराजांचे गादी पुरुष हभप प्रसाद महाराज मे महिन्याच्या रखरखत्या उन्हातही अनवाणी चालत होते.(जया अंगी मोठेपण तया यातना कठीण)तरीही त्यांच्या चेहऱ्यावर भक्तीचा आनन्द ओसंडून वाहत होता. उष्णतेने शरीराला वेदना होत असतानाही त्यांनी भक्तांकडील पान सुपारीचे कार्यक्रम कमी केले नाहीत. काही वर्षांपूर्वी दुपारी चार ला आटोपणारी पालखी मिरवणूक आता रात्री साडे दहा ला आटोपते. प्रसाद महाराजांच्या त्यागात असंख्य भक्तांचे समाधान दडलेले आहे. मिरवणूक बोरी नदीच्या वाळवंटात आल्यानन्तर प्रसाद महाराज आनंदाने आपले शिष्य मोहन महाराज बेलापूरकर यांच्यासह असंख्य भक्तांच्या अंगावर गुलाल उधळून जो आनन्द व्यक्त करतात त्याला तोड नाही. असह्य वेदना कुठे लुप्त होतात ते भक्तिरसात जाणवत नाही. आणि अशा वातावरणात इतक्या आनंदाने आम्ही पृथ्वी तलावर पालखी सोहळा संपन्न करून दाखवला. आम्ही किती आनंदात आहोत हे देवांनाही कळावे.... म्हणून आकाशातल्या देवांनाही संतांकडून हिणवण्याची व वाकोल्या दाखवण्याची ही परंपरा अजबच पण महान आहे. साक्षात परमेश्वराला वाकोल्या आणि हिणवण्याचे धाडस फक्त सच्चा भक्त करू शकतो हे निश्चित !

> प्रसाद महाराज व त्यांचे भक्त कधी हातातला रुमाल फिरवून , हाताचे वेगवेगळे इशारे करून वाकोल्या दाखवतात. देव मात्र आनन्द व्यक्त करू शकत नाहीत.. कारण देवाला पूर्णत्व नसते...त्याला पूर्णत्वासाठी मानव जन्मच घ्यावा लागतो...
>
> **–संजय कृष्णा पाटील,** अमळनेर

महाराष्ट्र शिक्षक पॅनलतर्फे रवींद्र ठाकरे यांना राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार प्रदान

देवगाव, ता पारोळा | वार्ताहर

महाराष्ट्र शिक्षक पॅनल तर्फे गुरुदक्षिणा हॉल नाशिक येथे देवगांव येथील रहिवासी व जिल्हा परिषद रुंधाडी ता. अमळनेर शाळेतील तंत्रस्नेही शिक्षक रवींद्र राजाराम ठाकरे यांना राज्यस्तरीय सेवा सन्मान आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४सुप्रसिध्द कवी अंतनजी राऊत, मराठी चित्रपट सुप्रसिद्ध अभिनेत्री किशोरीताई शहाणे व महाराष्ट्र शिक्षक पॅनलचे अध्यक्ष दिपक चामे यांच्या हस्ते पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र शिक्षक पॅनल तर्फे महाराष्ट्रातील उल्लेखनीय कार्य केलेल्या शिक्षकाच्या कार्यकर्तृत्वाची दखल घेऊन राज्यस्तरीय सेवा सन्मान पुरस्कार सोहळा गुरुदक्षिणा हॉल कॉलेज रोड, नाशिक येथे दि. २४मे २०२४ रोजी आयोजित करण्यात आला होता. गेल्या अनेक वर्षांपासून विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवीत विद्यार्थ्यांना कृतीशील अध्यापन करणारे उपक्रमशील तंत्रस्नेही शिक्षक म्हणून परिचित आहेत त्यांनी केलेल्या शैक्षणिक व सामाजिक दखल घेऊन शिक्षक फाउंडेशन द्वारा संचलित महाराष्ट्र शिक्षक पॅनलतर्फे त्यांना राज्यस्तरीय सेवा सन्मान आदर्श शिक्षक प्रदान करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध कवी अनंतजी राऊत, सुप्रसिद्ध मराठी चित्रपट अभिनेत्री किशोरीताई शहाणे तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र पॅनलचे अध्यक्ष दिपक चामे हे होते, उपाध्यक्षा मेघराणी जोशी, सचिव सतिश कोळी, राजश्री पाटील, पंकजकुमार पालीवाला उपस्थित होते यावेळी आमदार चिमणराव पाटील जिल्हा बॅक उपाध्यक्ष अमोल पाटील, सरपंच समीर पाटील,रुंधाडी सरपंच, यांनी अभिनंदन केले.

हजला जाऊन मतदारसंघाचा विकास, शांती-अमनसाठी दुवा मागावी -आ. किशोर पाटील

पाचोरा | प्रतिनिधी

मुस्लीम धर्मात दिलेल्या सामाजिक कर्तव्याचा भाग असलेली हजयात्रा ही अल्लाहाच्या हाकेला दिलेली साद असून अनेक जण दरवर्षी हजयात्रेसाठी जात असतात. त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मी देखील तेवढाच उत्सुक असतो. तसेच हजला जाणाऱ्या सर्व हाजींनी मतदारसंघाच्या विकासासह संपूर्ण मानव जातीच्या शांती अमनसाठी अल्लाहकडे दुवा मागावी अशी भावनिक साद आ.किशोर अप्पा पाटिल यांनी सत्कार करताना दिली. पाचोरा व भडगाव तालुक्यातून हजसाठी जानाऱ्यांचा पाचोरा शहरातील आठवडे बाजारातील नूर मस्जिद येथे गुरुवारी संध्याकाळी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात करण्यात आले होते.

यावेळी मंचावर वहाब बागवान,माजी नगरसेवक बंडू चौधरी, रहेमान तडवी, नूर मस्जिदचे खतीबो-इमाम मौलाना जीशान रजा साहेब, शिक्षक सेनेचे विजय ठाकूर, कदीर शब्बीर, व प्रवीण ब्राह्मणे यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना आमदार म्हणाले की, मुसलीम धर्मात जसे हज यात्रेला महत्व आहे तसेच हिंदू धर्मात देखील चारधाम यात्रेला महत्व आहे . सर्वच धर्मगुरूंनी, महापुरुषांनी मानव जातीच्या कल्याणासाठी काम केले आहे .आमचे कुटुंब देखील गेल्या दोनशे वर्षांपासून विठ्ठलाच्या भक्तीत रममान होणारे आहे.

शांतता व परस्परातील धार्मिक सामाजिक सलोख्यामुळे मतदारसंघाचा विकास करणे आपल्याला शक्य होत असल्याचे मतही मांडले. नूर मस्जिदचे खतीबो-इमाम मौलाना जीशान रजा साहेब, कदीर शब्बीर आदींनी मनोगत व्यक्त केले. खतिबो-इमाम जिशान रजा , अध्यक्ष महमूद खान वहाब बागवान, जहांगीर पिंजारी, जाकीर खाटीक,उस्मान खाटीक,जॅकी खाटीक,फारुख पिंजारी, नवीद देशमुख,शरीफ रंगरेज, सलीम मनयार आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार हशेख जावेद रहिम यांनी केले. कार्यक्रमाला नगरदेवळा, नालबंदी, भोकरी, शेंदुर्णी, पाचोरा ,भडगाव येथील हाजींची उपस्थिती होती.

शाळेच्या पहील्याच दिवशी मिळणार विद्यार्थ्यांच्या हातात मोफत पाठयपुस्तके

भडगाव | वार्ताहर

शासनाच्या समग्र शिक्षा योजनेअंतर्गत भडगाव तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद, शासकीय अनुदानित व खासगी अनुदानित शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्वच विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके दिली जातात. दरवर्षाप्रमाणे यावर्षी सुद्धा शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हातात पाठ्यपुस्तके दिली जाणार आहेत. २०२२-२३च्या विद्यार्थी संख्येनुसार १९ रोजी ६३ हजार ३०० पाठ्यपुस्तके प्राप्त झाली आहेत. जवळपास ९७ टक्के प्राप्त झाले आहेत.जून महिन्यात शाळा उघडण्याआधी शाळांना पुस्तके वाटप करण्यात येतील. ही पुस्तके भडगाव तालुक्यातील वाय.एम.खान उर्दु माध्यमिक भडगाव येथे उतरवण्यात आली आहेत.

गटशिक्षणाधिकारी गणेश पाटील यांच्या मार्गदर्शनाने पुस्तके वितरण करण्याचे कार्य गट साधन केंद्रातील कर्मचारी समावेशित विशेष तज्ञ निंबा परदेशी,सुभाष माळी, समावेशित विषयतज्ञ,मनोहर माळी,डाटा एन्टी ऑपरेटर किशोर पुजारी,विशेष शिक्षक मिलिंद सोनवणे,जितेंद्र माने,छाया देसले,किशोर पाटील,छाया ढोले व शिवाजी भोसले हे करीत आहेत.

> शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना प्रवेशित वर्गाची पुस्तके मिळाल्याने त्यांचा आनंद द्विगुणीक होतो. त्या सोबतच त्यांची उपस्थीती ही टिकुन राहते.पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना पुस्तके प्राप्त होण्यासाठी आम्ही कटबध्द आहोत.
>
> **–गणेश पाटील,** गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती भडगाव

संत सखाराम महाराज पुण्यतिथीनिमित्त शिधा वाटप

अमळनेर | प्रतिनिधी

संत सखाराम महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त संत सखाराम महाराज विठ्ठल रुख्मिनी संस्थान तर्फे पुजारी, गावकरी, बारा बलुतेदार, डफवाले, नाथबुवा याना शिधा वाटप करण्यात आले.

अमळनेरचा संत सखाराम महाराज यात्रोत्सव हा सर्व जाती धर्माचा बारा बलुतेदारांचा यात्रोत्सव असतो. प्रत्येक जाती धर्माच्या प्रतिनिधीला या यात्रेत विविध संधीतून सन्मान दिला जातो. सर्वांचा सहभाग असल्याने ही यात्रा म्हणजे ऐक्य आणि सामाजिक सलोख्याचे प्रतीक आहे. यात्रेनिमित्त संस्थांनतर्फे पुजाऱ्याना पाच डमरू कणिक, २ माप तांदूळ, तूरडाळ एक माप, तिखट, जिरे, मोहरी, हळद, मीठ, तेल तर गावकरी व नाथबुवा डफ वाले याना ४ पाट्या कणिक, दोन पसा तांदूळ, तूरडाळ दोन पसा असे शिधा साहित्य वाटप केले जाते. एकूण पुजारी व गावकरी १४५ जणांना आणि ७८ नाथबुवांना शिधा वाटप करण्यात आले.

तसेच सकाळी हभप हर्षद किसन गोळेसर यांचा अभंग रंग कार्यक्रम झाला तर दुपारी छत्रपती संभाजी नगर येथील सखा माऊली भजनी मंडळ यांचा भारुड व संगीत भजनाचा कार्यक्रम झाला. त्याचप्रमाणे गंधाली मनोज देशपांडे कथक नृत्य , हभप श्रीनिवास महाराज उत्राणकर यांचे परंपरेचे भजन व समाधी समोर हभप भगवान बुवा सडगाव , हभप बेलापूरकर महाराज , हभप प्रकाशबुवा महाराज ,हभप शारंगधर बुवा चाळीसगाव , हभप रुपचंद बुवा यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम झाला.

प्रकाशभाई पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे अखिलेशश्वरदास महाराज यांच्या हस्ते उदघाटन

अमळनेर | प्रतिनिधी

२७ मे रोजी झाडी येथील मूळ रहिवासी व राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित गुजराथ एटीएस मधील निवृत्त पोलीस अधिकारी प्रकाशभाई आर पाटील यांच्या अमळनेर येथील जनसंपर्क कार्यालयाचा भव्य उद्घाटन सोहळा केंद्रीय मार्गदर्शक मंडल धर्माचार्य प पू महामंडलेश्वर श्री अखिलेश्वरदासजी महाराज यांच्या शुभ हस्ते २७ रोजी सकाळी १०.४८ वाजता संपन्न होत आहे.

प्रकाशभाई पाटील यांनी सेवानिवृत्ती नंतर अमळनेर तालुक्यात विविध लोकोपयोगी कामे करण्यासाठी आपले उर्वरित आयुष्य सार्थकी लावण्याचे ठरवले आहे. त्यासाठी रुग्णांच्या सेवेसाठी एक रुग्णवाहिका व विविध बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी सेवा करण्यासाठी त्यांनी नियोजन केले आहे. त्यासाठी जनतेचा संपर्क व्हावा यासाठी त्यांचे संपर्क कार्यालय सुरू झाले आहे. जनतेच्या सेवेसाठी २४ तास त्यांचा प्रयत्न राहणार आहे.

असा होईल उद्घाटन सोहळा - सकाळी ७.३० वाजता झाडी येथील ममलेश्वर महादेव मंदिरावर केंद्रीय मार्गदर्शक मंडल धर्माचार्य प.पू. महामंडलेश्वर श्री अखिलेश्वरदासजी महाराज यांचे आगमन व होमहवन कार्यक्रम, हॉटेल मिडटाऊन येथून सकाळी १० वाजेपासून बग्गीवर केंद्रीय मार्गदर्शक मंडल धर्माचार्य प. पू. महामंडलेश्वर श्री अखिलेश्वरदासजी महाराज यांचा मिरवणूक कार्यक्रम, ही मिरवणूक हॉटेल ते सुभाष चौक, ते स्टेशन रोडवरून, तहसील कार्यालयाकडे मार्गस्थ होईल व महाराणा प्रताप चौकात आगमन त्यानंतर धुळे रस्त्यावरील शिवांश बिझिनेस हब येथे कार्यालय स्थळी आगमन त्यानंतर १०.४८ वाजता जनसंपर्क कार्यालयाचे भव्य उदघाटन केंद्रीय मार्गदर्शक मंडल धर्माचार्य प.पू. महामंडलेश्वर श्री अखिलेश्वरदासजी महाराज यांच्या हस्ते करण्यात येईल. तसेच रुग्णांसाठी रुग्णवाहिकेचे देखील लोकार्पण महाराजांच्या हस्ते होईल. यासाठी तालुक्यातील नागरिकांनी अगत्याने येण्याचे आवाहन प्रकाशभाई आर पाटील यांनी केले आहे.

कोळगावकरांनी वानराच्या दशक्रिया विधीत अनेकांनी केले मुंडन

१३ व्याला वैशाली सुर्यवंशी कडून दुखवटा वाटप

गुढे, ता.भडगाव | वार्ताहर

येथून जवळच असलेल्या कोळगाव येथे काही दिवसापूर्वी झाडावरून उडया मारतांना वानर पडून जागेवर मृत झाले होते ग्रामस्थांनी भूतदया सोबत वानराला रामभक्त हनुमानाचे रूप तथा वानरदेवता समजून ग्रामस्थांनी विधिवत संस्कार करून डोली सजवून गावातून वाजत गाजत चार खांदेकरी व आगरकरांनी अंत्ययात्रा काढली आणि साश्रूनयनांनी डोळे पाणावत अखेरचा निरोप दिला.एवढेच नव्हे तर गावाने दहा दिवस दुखवटा पाळत दशक्रिया विधीत अनेकांनी मुंडन करत तेराव्याचा विधीवत संस्कार पार पाडण्यात आला असून याप्रसंगी पाचोरा येथील उभा ठाकला गगटाच्या शिवसेना महिला नेत्या वैशाली ताई नरेंद्रसिंग सुर्यवंशी यांच्या वतीने ग्रामस्थांना दुखवट्याचे वाटप करण्यात आले.

कोळगावकरांनी मृत वानराला हनुमानाचे प्रतिरुप समजून त्याचा अंतिम संस्कार पूजा विधी करून सोपस्कार आटपले या मृत वानराने कोळगावकरांना मोठा हदयपूर्वक लळा लावला होता. काही दिवसांपूर्वी त्याचे झाडावरून पडून जागेवर निधन झाल्याने गावकर्यांना हळहळ व्यक्त करत अनेकांना धक्का बसला या वानररूपी रामसेवकाला गावकर्यांनी साश्रू नयनांनी निरोप दिला. ग्रामस्थांनी दहा दिवस दुखवटा पाळत त्यांचे गावातील एका महिलेने दु:ख देखील धरले होते त्यानंतर ग्रामस्थांनी स्वंस्फूर्तीने वानरदेवता समजून दशक्रिया विधीत अनेकांनी मुंडन केले

यानंतर आज वानरदेवाचे तेरावे सर्व प्रकारचे विधीवत संस्कार पार पाडण्यात आले.याप्रसंगी शिवसेना-उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या वैशालीताई नरेंद्रसिंग सुर्यवंशी यांच्या वतीने कोळगावकरांना दुखवट्याच्या स्वरूपात टॉवेल-टोपीचे वाटप करण्यात आले.कोळगावकरांनी वानरदेवता समजून जी भूतदया दाखविली म्हणून परिसरात हा विषय चर्चेचा व कौतुकाचा ठरला आहे.

कोविशिल्ड/को-वॅक्सीन लस घेतलेल्या नागरिकांचे आरोग्यासाठी उपाय योजना करा

नगरपालिकेचे माजी आरोग्य सभापती श्याम पाटील यांची प्रांताधिकाऱ्यांकडे केली मागणी

अमळनेर | वार्ताहर

कोविड १९ लसीकरणासाठी वापरण्यात आलेल्या कोविशिल्ड / को-वॅक्सीन लसी संदर्भात सर्व प्रकाराची शासनाने केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून योग्य ती माहिती घेऊन कोविशिल्ड / को-वॅक्सीन लस घेतलेल्या नागरिकांचे आरोग्य मार्गदर्शन व उपाय योजना कराव्यात, अशी मागणी नगरपालिकेचे माजी आरोग्य सभापती श्याम जयवंतराव पाटील यांनी केली आहे.

श्याम पाटील यांनी प्रांताधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या जगभरात कोविशिल्ड / को-वॅक्सीन लसी बाबत अनेक मते मांडण्यात येत असून लंडन येथील उच्च न्यायालयात या विरुद्ध ५१ संस्था व लोकांनी मिळून दिवानी दावे दाखल केले आहेत. त्यात त्यांनी कोविशिल्ड लसीमुळे मानवी आरोग्यावर होणारे परिणाम नमूद केलेले आहेत. कोविशिल्ड / को-वॅक्सीन लस घेतल्याने टी.टी.एस. (थ्रोम्बो सायटोपेनिया सयंद्रोमे) चा त्रास वाढून ब्रेनस्ट्रोक, हार्टस्ट्रोक, चेस्टपेन या सारखे आजार होत असल्याचे नमूद करण्यात आले आहेत. वरील लोकांनी केलेल्या दाव्यात तथ्य असल्याचे कोविशिल्ड लस बनवणाऱ्या अस्ट्राझेनेका कंपनीने देखील फेब्रुवारी २०२४ मध्ये लंडन येथील न्यायालयात मान्य केले आहे. भारतात अस्ट्राझेनेका व सिरम इन्स्टिट्यूट यांनी मिळून उत्पादित केलेली कोविशिल्ड ह्या लसीचा पहिला डोस १६ जानेवारी २०२१ रोजी देण्यात आला. मात्र मार्च २०२१ मध्ये कोविशिल्ड / को-वॅक्सीन या लसीस संयुक्तराष्ट्र व युरोपियन देशातील ऑस्ट्रेलिया, जर्मनी, इटली, ग्रीस, स्पेन, नेदरलॅन्ड, स्वित्झर्लंड यांच्यासह जगभरातील अनेक देशांमध्ये बंदी घालण्यात आली होती. परंतु या विषयी भारत सरकार व आरोग्य मंत्रालया कडून या बाबतीत कुठलेही योग्य पाऊले उचलण्यात आली नसल्याने आजपर्यंत भारतात या लसींचे १७५ कोटी डोसेस देण्यात आले आहेत. त्यात कोविशिल्ड लसीचे ८०% व को वॅक्सीन लसीचे २०% प्रमाण होते.

आपल्या अमळनेरसह परिसरातील लोकांनी देखील कोविशिल्ड को-वॅक्सीन ही लस घेतली असून अनेकांना त्याचा त्रास उद्भवून त्यात काही लोकांचे प्राण देखील गेल्याची उदाहरणे समोर येत आहेत. वरील सर्व प्रकाराची शासनाने केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून योग्य ती माहिती घेऊन कोविशिल्ड / को-वॅक्सीन लस घेतलेल्या नागरिकांचे आरोग्य राखण्यासाठी मार्गदर्शन व उपाय योजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

निवडणूक रणनितीकार | **प्रशांत किशोर यांचा दावा**

४०० पारचा नारा कठीण; मोदी सत्ता स्थापन करतील

नवी दिल्ली– भाजपने यंदाच्या लोकसभा निवडणुकीत दिलेला ४०० पारचा नारा खरा ठरणे कठीण असल्या निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी म्हटले आहे. पण असे असले तरीदेखील देशात मोदींचंच सरकार स्थापन होईल, असा दावाही प्रशांत किशोर यांनी केला आहे. नरेंद्र मोदी हे देशात तिसऱ्यांदा सत्ता स्थापन करणार असून भाजपला गेल्या वेळीप्रमाणे ३०३ च्या जवळपास जागा मिळतील असा दावा निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी एका वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत केला आहे.

राजकीय विश्लेषक प्रशांत किशोर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळात पेट्रोलियम उत्पादनं जीएसटीच्या कक्षेत आणली जाऊ शकतात. राज्यांच्या आर्थिक स्वायत्ततेला आळा बसू शकतो. इंडिया टुडेला दिलेल्या मुलाखतीत प्रशांत किशोर यांनी मोदी सरकारच्या भ्रष्टाचारविरोधी कथनात संरचनात्मक आणि कार्यात्मक बदलांची भविष्यवाणी देखील केली आहे. प्रशांत किशोर म्हणाले, मला वाटतंय की मोदी ३.० सरकार धमाकेदारपणे सुरू होईल. केंद्रात सत्ता आणि संसाधनं या दोन्हींचं जास्त केंद्रीकरण करण्याचा प्रयत्न होईल. राज्यांची आर्थिक स्वायत्तता कमी करण्याचाही प्रयत्न केला जाऊ शकतो. २०१४ मध्ये भाजप आणि पंतप्रधान मोदी यांच्या निवडणूक प्रचाराचं व्यवस्थापन करणारे प्रशांत किशोर म्हणाले की, पंतप्रधानांविरुद्ध कोणताही मोठा राग नाही आणि भाजप सुमारे ३०३ जागा जिंकेल.

पेट्रोल–डिझेल जीएसटीच्या कक्षेत आणता येईल

राजकीय रणनीतीकार किशोर म्हणाले की, राज्यांकडे सध्या महसुलाचे तीन प्रमुख स्रोत आहेत – पेट्रोलियम, दारू आणि जमीन. ते म्हणाले की, पेट्रोलियम जीएसटीच्या कक्षेत आणल्यास मला आश्चर्य वाटणार नाही, सध्या पेट्रोल, डिझेल, एटीएफ आणि नैसर्गिक वायू या गोष्टी जीएसटीच्या कक्षेबाहेर आहेत. दरम्यान, सध्या अजूनही व्हॅट, केंद्रीय विक्री कर आणि केंद्रीय उत्पादन शुल्कावर एक्साइज ड्युटी लागते.

पेट्रोल जीएसटीच्या कक्षेत आणल्यास काय होईल?

पेट्रोलियम पदार्थांना जीएसटीच्या कक्षेत आणण्याची उद्योगधंद्यांची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. देशातील राज्य या मागणीच्या विरोधात आहेत, कारण यामुळे राज्यांच्या महसुलाचं मोठं नुकसान होणार आहे, असंही ते म्हणाले. उदाहरणार्थ, पेट्रोल जीएसटीच्या कक्षेत आणल्यास राज्यांना कर तोटा होईल आणि राज्यांना त्यांचा हिस्सा मिळविण्यासाठी केंद्रावर अधिक अवलंबून राहावे लागेल. सध्या ऋड्ढ अंतर्गत सर्वोच्च कर स्लॅब २८ टक्के आहे. पेट्रोल आणि डिझेल सारख्या इंधनांवर १०० टक्क्यांपेक्षा जास्त कर लागतो.

भाजपा नवी दिल्लीत सातही जागा जिंकणार

आचार्य प्रमोद कृष्णम यांचे भाकीत

नवी दिल्ली । देशात लोकसभा निवडणुकीचे सहा टप्पे पूर्ण झाले आहेत. दरम्यान, २०२४ च्या या लोकसभा निवडणुकीत भाजपा दिल्लीतील सर्व ७ जागा जिंकणार असल्याचा दावा आचार्य प्रमोद कृष्णम यांनी केला आहे. एवढेच नाही तर आचार्य प्रमोद कृष्णम यांनी आरजेडी नेते तेजस्वी यादव यांच्या भाजपावरील विधानवरही प्रतिक्रिया दिली आहे.

४ जून रोजी लोकसभा निवडणुकीचे निकाल येतील आणि त्यानंतर संपूर्ण विरोधक विभागले जातील, असे आचार्य प्रमोद कृष्णम म्हणाले. तसेच, आचार्य प्रमोद कृष्णम म्हणाले की, तेजस्वी यादव बरोबर आहेत, त्यांनी फक्त एक ओळ चुकीची सांगितली. तेजस्वी यादव यांनी 'टन-टन-टन टन-टन-तारा', पूरा विपक्ष बंटाधार है, असे म्हणायला हवे होते. पुढे आचार्य प्रमोद कृष्णम म्हणाले, बिहारमध्ये सातही टप्प्यात निवडणुका लढल्या जात आहेत. ४० लोकसभा मतदारसंघांसह, सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये चौथ्या क्रमांकाचे राज्य आहे. तसेच, बिहार हे भारतीय राजकारणाला आकार देण्यामध्ये महत्त्वपूर्ण स्थान आहे. शुक्रवारी (२४ मे) तेजस्वी यादव यांनी भाजपावर टीका करत म्हटले होते की, भाजपा ४ जूननंतर गायब होणार आहे. तसेच, एक्स (पूर्वीचे ट्विटर) वर एक व्हिडिओ पोस्ट करताना, तेजस्वी यादव म्हणाले होते की, टन टना टन टन टारा, बीजेपी होगी नौ दो ग्यारह. दरम्यान, तेजस्वी यादव देखील सतत निवडणूक प्रचारात व्यस्त आहेत. भाजपावर सतत निशाणा साधत आहेत. कधी कविता म्हणत तर कधी फिल्मी शैलीत ते भाजपावर निशाणा साधत आहेत.

बिहार हे भारतीय राजकारणाला आकार देण्यामध्ये महत्त्वपूर्ण स्थान

अल्पसंख्याकांविरुध्द अवाक्षरही काढले नाही

नवी दिल्ली । 'अल्पसंख्याविरोधात कधीही एक शब्द उच्चारला नाही. भाजप आजच नाही तर यापूर्वी कधीही अल्पसंख्याकांविरोधात नव्हता. मात्र आपण कोणालाही 'विशेष नागरिक' म्हणून स्वीकारण्यास तयार नाही, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

रविवारी दिलेल्या एका मुलाखतीत पंतप्रधान मोदी यांनी अल्पसंख्याकांबाबत विरोधकांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर दिले. मोदींची निवडणूक प्रचार भाषणे सांप्रदायिकदृष्ट्या फूट पाडणारी आणि ध्रुवीकरण करणारी आहेत हा विरोधकांचा आरोप त्यांनी खोडून काढला. ''काँग्रेसने सातत्याने राज्यघटनेच्या धर्मनिरपेक्ष भावनेचे उल्लंघन केले आहे. अल्पसंख्याकांना संतुष्ट करण्यासाठी मतपेढीचे राजकारण करण्याचा काँग्रेसचा डाव उधळून लावणे हा माझ्या प्रचार भाषणांचा उद्देश आहे,'' असे मोदी म्हणाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जवाहरलाल नेहरू यांसह भारताच्या राज्यघटना निर्मात्यांनी धर्माच्या आधारावर आरक्षण नसल्याचा निर्णय घेतल्याचे मोदींनी नमूद केले.

आरक्षण धर्माच्या आधारावर नको

आरक्षणाच्या मुद्द्याला धर्माच्या आधारावर जोडणे चुकीचे आहे. राज्यघटना आणि त्यांच्या निर्मात्यांना धर्माच्या आधारावर आरक्षण कधीच नको होते. काँग्रेसनेच अनेक राज्यांमध्ये आरक्षण सौम्य केले आहे, धर्माच्या आधारावर दिले आहे आणि राज्यघटनेचा अपमान केला आहे. त्यांना धर्माच्या आधारावर आरक्षण राष्ट्रीय स्तरावर करायचे आहे. मात्र मी हे कधीही होऊ देणार नाही, असे पंतप्रधान यांनी सांगितले.

राज्यघटनेच्या कल्याणातच माझे कल्याण

पंतप्रधान मोदी यांनी स्वत:च्या जीवनाच्या वाटचालीचे श्रेय राज्यघटनेला दिले. कोणी असे गृहीत धरले की मी स्वार्थापोटी काम करत आहेत. मात्र असे असले तरी माझे स्वत:चे कल्याण राज्यघटनेच्या कल्याणामध्ये आहे, असे पंतप्रधान म्हणाले. भाजपच्या नेतृत्वाखालील रालोआ सरकार लोकसभा निवडणुकीत ४०० पेक्षा जास्त जागा जिंकल्यास राज्यघटना बदलेल आणि आरक्षण संपवतील, हा विरोधकांचा आरोप मोदींनी नाकारला. भाजपचे सर्वाधिक मंत्री अनुसूचित जाती-जमाती आणि ओबीसी समाजातील आहे, असे मोदींनी नमूद केले.

मोदी सरकारकडून अधिक रोजगार

तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचा आताच्या सरकारचा प्रयत्न मागील सरकारच्या तुलनेत सर्वोत्तम आहे. अंतराळ, सेमीकंडक्टर उत्पादन आणि विद्युत वाहने या उदयोन्मुख क्षेत्रांना पाठिंबा दिला आहे. तसेच नवोद्योगांना मदत, भरीव खर्च, पायाभूत सुविधा आणि उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजना (पीएलआय) यांमुळे अधिक रोजगार निर्माण होण्यास मदत झाली आहे, असे मोदी म्हणाले.

दक्षिणेत अधिक जागा भाजपच्याच

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ठामपणे सांगितले की भाजप दक्षिणेतील सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास येईल. दक्षिणेत अधिक जागा मिळवून राष्ट्रीय लोकशाही आघाडी ४०० जागांचे लक्ष्य पार करेल, असे ते म्हणाले. ''अल्पसंख्याविरोधात कधीही एक शब्द उच्चारला नाही. भाजप आजच नाही तर यापूर्वी कधीही अल्पसंख्याकांविरोधात नव्हता. मात्र आपण कोणालाही 'विशेष नागरिक' म्हणून स्वीकारण्यास तयार नाही, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले. 'पीटीआय व्हीडिओज'ला रविवारी दिलेल्या मुलाखतीत पंतप्रधान मोदी यांनी अल्पसंख्याकांबाबत विरोधकांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर दिले. मोदींची निवडणूक प्रचार भाषणे सांप्रदायिकदृष्ट्या फूट पाडणारी आणि ध्रुवीकरण करणारी आहेत हा विरोधकांचा आरोप त्यांनी खोडून काढला. ''काँग्रेसने सातत्याने राज्यघटनेच्या धर्मनिरपेक्ष भावनेचे उल्लंघन केले आहे. अल्पसंख्याकांना संतुष्ट करण्यासाठी मतपेढीचे राजकारण करण्याचा काँग्रेसचा डाव उधळून लावणे हा माझ्या प्रचार भाषणांचा उद्देश आहे,'' असे मोदी म्हणाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जवाहरलाल नेहरू यांसह भारताच्या राज्यघटना निर्मात्यांनी धर्माच्या आधारावर आरक्षण नसल्याचा निर्णय घेतल्याचे मोदींनी नमूद केले.

आरक्षण धर्माच्या आधारावर नको

आरक्षणाच्या मुद्द्याला धर्माच्या आधारावर जोडणे चुकीचे आहे. राज्यघटना आणि त्यांच्या निर्मात्यांना धर्माच्या आधारावर आरक्षण कधीच नको होते. काँग्रेसनेच अनेक राज्यांमध्ये आरक्षण सौम्य केले आहे.

दिल्लीतील नवमतदारांचा कौल कुणाकडे?

प्रथमच मतदान करणाऱ्यांमध्ये दिसला उत्साह

कोलकता । अठराव्या लोकसभेसाठी राजधानी दिल्लीत शनिवारी झालेल्या मतदानात सातही जागांवरील उमेदवारांचे भवितव्य महिलांच्या बरोबरीने मुख्यतः युवा वर्ग ठरवणार आहे. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार दिल्लीत १८ ते ३९ वयोगटातील तरुण मतदारांची संख्या सन २०१४मध्ये ४६.४५ टक्क्यांवर पोहोचली आहे. प्रथमच मतदान करणाऱ्या तरुणांमध्ये मतदानाचा उत्साह दिसला व त्यातील अनेकांनी रोजगारासारख्या मुद्द्यांवरच आपल्या आयुष्यातील पहिला मतकौल दिल्याचे चित्र आहे.

मतदान करणारे युवक जागृत असल्याचेही दिसले. तुर्कमान व अजमेरी गेट भागात काही लोक पैसे वाटत असल्याची चर्चा होती. त्या वेळी तेथील तरुणांनी, 'पैसे के लिये हम हमारा जमीर नही बेचेंगे,' अशा शब्दांत संबंधितांच्या कार्यकर्त्यांना फटकारले. निवडणूक आयोगाने अलीकडेच दिलेल्या आकडेवारीनुसार, यंदा दिल्लीत एकूण एक कोटी ५२ लाख १ हजार ९३६ मतदार आहेत. जानेवारी-एप्रिलपर्यंतच्या तीन महिन्यांत दिल्लीत सुमारे नऊ लाख नवीन मतदारांची भर पडली. केवळ ४० ते ४४ वयोगटातील सुमारे १७ लाख ४५ हजार मतदारही दिल्लीत आहेत. दिल्लीत एकूण संख्येच्या निम्म्याहून जास्त म्हणजे सुमारे ५६-५७ टक्के मतदार १८ ते ४४ वयोगटातील आहेत. म्हणजे दिल्लीच्या उमेदवारांच्या भवितव्याची चावी महिलांच्या बरोबरीने तरुणांच्या हाती असल्याचे स्पष्ट आहे. रोजगार क्षेत्रातील अध्ययनाबाबत अग्रगण्य मानल्या जाणाऱ्या सीएमआय संस्थेच्या अहवालानुसार, करोनाच्या नंतर देशातील बेरोजगारीत सातत्याने वाढ होत असून केवळ करोनाच्या दुसऱ्या लाटेनंतर देशात रोजगार गेलेल्यांची संख्या सुमारे दोन कोटींच्या आसपास आहे. त्यातही शहरी भागातील बेरोजगारीच्या प्रमाणात मोठी वाढ होत आहे. साहजिकच शहरी तरुणांसमोर रोजगार हा मोठा प्रश्न असल्याचे ओळखून काँग्रेस, आम आदमी पक्ष (आप) व भाजप या रिंगणातील सर्व प्रमुख पक्षांनी शिक्षण, रोजगार आणि स्टार्टअपशी संबंधित गॅरंटी दिल्या आहेत. तरुण मतदारांना आकर्षित करण्यासाठी तीनही पक्षांनी लोकप्रिय आश्वासने दिली आहेत. भाजप व आपचे खास दिल्लीसाठी वेगळे जाहीरनामे आहेत. त्यातही रोजगार, स्वयंरोजगार हे ठळक मुद्दे आहेत. दिल्लीतील किमान २ लाख ८० हजार तरुणांनी या निवडणुकीत पहिल्यांदाच मतदान केले. सन २०१९च्या निवडणुकीत दिल्लीकर तरुण मतदारांची संख्या ९७,६८४ होती. सन २०१४च्या निवडणुकीत लोकपाल आंदोलन व इतर कारणांमुळे भाजपला मत देण्यासाठी तरुण मतदारांनी दिल्लीत बूथवर मोठी गर्दी केली होती. यंदा मतदार यादीत नाव नोंदविण्याबाबत सुरुवातीला तरुणांमध्ये उत्साह दिसला नाही. बिहार, दिल्ली आणि उत्तर प्रदेशात १८ वर्षे पूर्ण झालेल्या सुमारे २५ टक्क्यांपेक्षा कमी तरुणांनी मतदार म्हणून नोंदणी केली होती. याबाबत महाराष्ट्रातील (२२ टक्के) परिस्थितीही फारशी चांगली नव्हती. मात्र दिल्लीत नंतर आप व भाजपने मतदार नोंदणीची मोहीम वेगवान केली व चित्र पालटत गेले. प्रगती मैदानावरील नवमतदार संमेलनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणानंतर काही मिनिटे सतत टाळ्यांचा गजर सुरू होता. तरुणांनी मतदान केंद्रांवर येऊन मतदान करावे, यासाठी दिल्लीतही 'रन फॉर डेमोक्रसी'सारखे उपक्रम राबविण्यात आले होते.

भाजपाकडून महिलांना दुय्यम वागणूक

काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा आरोप

नवी दिल्ली । भाजप महिलांना दुय्यम वागणूक देत आहे. या पक्षाचे वैचारिक पालक असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखांमध्ये महिला प्रवेश दिला जात नाही, अशी टीका काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गुरुवारी केला.

काँग्रेसचे उत्तर पश्चिम दिल्ली लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार उदित राज यांच्या समर्थनार्थ मंगोलपुरी येथे महिलांच्या मतदान सभेला संबोधित करताना गांधी म्हणाले की, भाजपने संसदेत महिला आरक्षण विधेयक मोठ्या थाटामाटात मंजूर केले, परंतु ते लागू करण्यासाठी प्रयत्न केले नाही. ते १० वर्षांनंतर लागू हाईल.

नोकरदार महिलांना घरी आल्यानंतर कामाची दुसरी पाळी करावी लागते आणि त्यांचे प्रयत्न दुर्लक्षित होतात. भारतात आपण समाजातील प्रत्येक घटकाबद्दल बोलतो, परंतु काम करणाऱ्या महिला घरी करतात त्या कामाचा उल्लेख क्वचितच केला जातो. नोकरदार महिलांना स्वत:कडे दुर्लक्ष करत जेवण बनवा, मुलांना सांभाळा किंवा इतर घरकामे करावी लागतात. त्याचा त्यांना मोबदलाही मिळत नाहीत.

जर पुरुष आठ तास काम करत असतील, तर महिला १६ तास काम करतात. हे एक प्रकारचे बिनपगारी आणि मान्यता नसलेले काम आहे, असे राहुल गांधी म्हणाले.

भाजपाचे चीनशी संबंध ; काँग्रेसचा खळबळजनक आरोप

नवी दिल्ली– भाजपचे चीनशी निकटचे संबंध असल्याचा आरोप करत काँग्रेसने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अनेक प्रश्न केले आहेत. त्याचबरोबर भाजपनेते आणि चिनी कम्युनिस्ट नेते यांच्यात २००८पासून झालेल्या १२ उच्चस्तरीय बैठकांची इतिवृत्ते जाहीर करावीत, अशी मागणीही काँग्रेसने केली आहे.

यासंदर्भात काँग्रेसचे नेते पवन खेरा यांनी एक निवेदन प्रसिद्ध केले आहे. त्यात भाजपचे चीनशी घनिष्ठ संबंध असून त्यांच्यात झालेल्या अनेक द्विपक्षीय बैठकांची फलश्रुती काय, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. खेरा म्हणाले, की जून २०२०मध्ये लडाखमधील कारवायांप्रकरणी मावळत्या पंतप्रधानांनी चीनला 'क्लीन चिट' दिल्यापासून, भाजप चीनविरोधात बोलण्यास का धजावत नाही? यामागे भाजप आणि चिनी कम्युनिस्ट पक्षाचे घनिष्ठ संबंध हे कारण आहे का, असाही प्रश्न खेरा यांनी विचारला आहे. भाजपचे नेते आणि चिनी कम्युनिस्ट पक्षाचे पदाधिकारी यांच्यात २००८पासून किमान १२ बैठका झाल्या आहेत. त्यापैकी बहुतेक बैठका चीनमध्येच झाल्या, असा दावाही खेरा यांनी केला. खेरा म्हणाले की ऑक्टोबर २००८मध्ये १५ सदस्यांच्या चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या शिष्टमंडळाने भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयास भेट दिली होती. त्यावेळी राजनाथ सिंह यांनी चीनशी सकारात्मक संबंधांसाठी भाजप अनुकूल असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली होती. जानेवारी २००९मध्ये चिनी कम्युनिस्ट पक्ष आणि पक्षाच्या पॉलिट ब्युरोची भेट घेण्यासाठी भाजप-रा.स्व. संघाच्या पदाधिकाऱ्यांचे एक पथक पाच दिवसांच्या बीजिंग-शांघाय दौऱ्यावर गेले होते, असा दावाही खेरा यांनी केला. भाजपचे तत्कालीन अध्यक्ष नितीन गडकरी जानेवारी २०११मध्ये चीनला गेले होते. तेथे त्यांनी कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्यांची सदिच्छा भेट घेतली होती, असेही खेरा यांनी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी उत्तर देण्याची मागणी

मोदींची चिनला 'क्लिनचिट'

काँग्रेसचे प्रश्न

भाजपचे नेते आणि चिनी कम्युनिस्ट पक्षाचे पदाधिकारी यांच्यात सन २००८पासून १२ बैठका झाल्या.

भाजप आणि चिनी कम्युनिस्ट पक्ष यांच्यात वारंवार का बैठका झाल्या? प्रत्येक बैठकीत नेमके काय झाले?

भाजपचे नेते चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या 'शाळेत' का गेले होते? त्यांना तेथे कोणते 'शिक्षण' मिळाले?

डोकलाम सीमेवर जून २०१७मध्ये संघर्ष झाला असताना भाजप-राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते चिनी कम्युनिस्ट पक्षाला का भेटले होते? त्यांच्यातील नाते नेमके काय आहे?

देशदूत
नंदुरबार जिल्हा
सोमवार, दि. २७ मे २०२४ | पान - ६



पवित्र कुरआन - सुराह ७, आयात १३७

आणि त्यांच्या जागी आम्ही त्या लोकांना ज्यांना दुबळे करून सोडले गेले होते, त्या भूमीच्या पूर्व व पश्चिमेचे वारस बनविले जिला आम्ही समृद्धीने संपन्न केले होते. अशाप्रकारे बनीइस्राईलच्या बाबतीत तुझ्या पालनकर्त्याचे इष्ट वचन पूर्ण झाले कारण त्यांनी संयमाची कास धरली होती आणि आम्ही फिरऔन व त्याच्या लोकांचे ते सर्वकाही नष्ट करून टाकले जे ते बनवीत होते व उभारीत होते.

सुराह १९ आयात ६९

मग प्रत्येक गटातून अशा प्रत्येक व्यक्तीला निवडून काढू जो परमदयाळूच्या विरोधात जास्त दुर्वर्तनी बनला होता.

जे.के.पार्क परिवार, नंदुरबार
मोफत कुरआन मिळविण्यासाठी संपर्क - ९८९०५६९६५२

पिंपळेश्वर महादेव मंदिर वर्धापन दिन उत्साहात

■ **नंदुरबार । वार्ताहर**

शहरातील बालवीर चौक, महात्मा बसवेश्वर नगर भागातील पिंपळेश्वर महादेव, हनुमान, गणेश मंदिराचा प्रथम वर्धापनदिन विविध धार्मिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

पिंपळेश्वर महादेव मंदिर उभारण्यात आले. प्रथम वर्धापन दिनाचे औचित्य साधून पिंपळेश्वर महादेव, हनुमान, गणेश मंदिरात महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी उद्योजक मोहिनीराज राजपूत, ॲड.अविनाश राजपूत, पत्रकार हिरालाल चौधरी यांना देण्यात आला. आरती वेळी राज्य कर्मचारी महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष रणजीतसिंग राजपूत, अजयसिंह राजपूत, न.पा. ठेकेदार राहुल राजपूत आदी उपस्थित होते. यावेळी भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे संयोजन महादू हिरणवाळे, अनिल कुंभार, सुदाम गवळी, संभाजी हिरणवाळे, सदाशिव गवळी, गोपाळ हिरणवाळे, जी.एस. गवळी,काशिनाथ गवळी, अमर हिरणवाळे, दिलीप कुंभार, लखन माळी, भरत मोरे, आदींनी संयोजन केले.

शहरातील जयहिंद नगरात घरफोडी

■ **नंदुरबार। प्रतिनिधी**

नंदुरबार शहरातील जितेंद्र गुरूमुखदास किंगर यांचे जयहिंद नगरात घर आहे. सदर घराच्या दरवाजाच्या सेंटर लॉक तोडून चोरटयांनी आत प्रवेश केला. यावेळी घरातील ३० जाराची रोकड ४५ हजार रूपये किंमतीचे १५ ग्रॅम सोन्याचे चैन, १३ हजार रूपये किंमतीचे १२५ ग्रॅम वजनाचे चांदीचे भांडे असा ऐवज चोरून नेला. याबाबत जितेंद्र किंगर यांच्या फिर्यादीवरून उपनगर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास उपनिरीक्षक अनिल गोस्वामी करीत आहेत.

कापूस बियाण्याची जादा दराने विक्री केल्यास कठोर कारवाई

कृषी विभागाचा इशारा

■ **नंदुरबार । दि.२६। प्रतिनिधी**

जिल्हयात खरीप २०२४ हंगामास सुरुवात होत असल्याने जिल्हयातील सर्व कृषि सेवा केंद्र स्तरावरुन कापुस बियाण्याच्या विशिष्ट वाणांची शासनाच्या कमाल किमतीपेक्षा वाढीव दराने विक्री केल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा कृषी विभागाने दिला आहे.

शेतकऱ्यांकडुन मोठ्या प्रमाणात मागणी असलेल्या कापुस बियाणेच्या विविध कंपन्यांच्या विशिष्ट वाणांची जादा दराने विक्री होऊ नये व त्यास प्रतिबंध करण्यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नंदुरबार यांचे अधिनस्थ क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांची कृषि सेवा केंद्र स्तरावर संपर्क अधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात आली आहे. जिल्हयातील काही अधिकारी/कर्मचारी तथा बियाणे निरीक्षक हे छुप्या पध्दतीने गस्त घालीत आहेत. भरारी पथक देखील कार्यान्वीत झाले आहे. ज्या ठिकाणी अशा पध्दतीने जादा दराने विक्री होण्याच्या संशय आहे, अशा दुकानातुन कापुस बियाणे विक्री केलेल्या शेतकऱ्यांची यादी घेवुन ग्राम स्तरावर पडताळणी करण्यात येईल. जादा दराने विक्री आढळुन आल्यास संबंधित कृषि सेवा केंद्रावर महाराष्ट्र कापुस बियाणे अधिनियम २००९ मधील तरतुदीनुसार तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याबाबतीत कंपन्यांच्या सहभाग आढळुन आल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कंपनीविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा नाशिक विभागीय कृषि सहसंचालक मोहन वाघ यांनी केले आहे. शेतकरी बांधवांच्या तक्रारी असल्यास जिल्हा स्तरावर कार्यान्वीत असलेले जिल्हा नियंत्रण कक्षात एस.ए.शेळके (९४०४११०८७८), एस.एन. देवरे (७५८८७६३०८९) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

बोगस बियाणे खते विकणाऱ्यांच्या मुसक्या फसवणूकीच्या आधी आवळाव्यात

■ **दत्तात्रय सूर्यवंशी**

तळोदा ।

पांढरे सोने लावणीचा हंगाम सुरू झाला आहे. शेतकरी कोणते बियाणे चांगले, कोणते वाण लावल्यास कमी खर्च व उत्पादन जास्त येईल याचा शोध घेत आहेत. अशात बियाण्यात फसवणुक होऊ नये अशी अपेक्षा शेतकऱ्यांतुन व्यक्त करण्यात येत आहे.

काळ्या मातीत घामाचा पैसा ओतून पांढरे सोनं पिकवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या बळीराजाच्या स्वप्नाची राखरांगोळी करण्याचा प्रयत्न काही बोगस बियाणे विक्रेत्यांकडून केला जातो. अक्कलकुवा, शहादा तालुक्यात बोगस बियाणे विक्रीचे रॅकेट उघड झाले आहे. तळोदा येथे ही सक्रिय असण्याची शक्यता नाकारता येत नाही. खापर, अक्कलकुव्यात लाखो रुपयांचा बोगस बियाण्यांचा साठा कृषी विभागाने जप्त केला आहे. या कारवायांमुळे बोगस बियाणे विक्रीचे रॅकेट किती सक्रिय आहे, हे दिसून येते. कृषी विभागाकडून केल्या जाणाऱ्या कोटा कारवायामुळेच अशा बियाणे विक्रेत्यांचे धाडस वाढल्याचे सांगितले जात आहे.

मान्सुमला लवकरच सुरुवात होत आहे. अवकाळीच्या सरी काही पावसाच्या ठिकाणी बरसल्या आहेत. मागील वर्षाच्या दुष्काळामुळे शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबला गेला आहे. परंतु अशाही परिस्थितीतही बळीराजा कर्ज काढून शेतात पांढरं सोनं पिकवण्याचे स्वप्न उराशी बाळगुन जोमाने तयारीला लागला आहे. उन्हाची तिव्रता कमी होण्याची वाट पाहत आहे. यावर्षी ११० टक्के पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आल्याने यंदाचा हंगाम चांगला राहील, चांगल्या पावसाचं भाकीत हवामान विभागाने केल्याने शेतकऱ्यांचा आशा पल्लवित झाल्या आहेत. त्यामुळे बळीराजाला या हंगामात चांगलं पिक येण्याची आस आहे. तळोदा तालुक्यात मोठ्या प्रमाणावर बागायती व जिरायती कापसाची लागवड मोठ्या प्रमाणात होत असते. अशा परिस्थितीत बोगस बियाणे विक्रेत्यांनी त्यांचा धंदा सुरु केला असल्याची कुजबुज शेतकऱ्यांत सुरू आहे.

तळोदा गुजरातच्या सीमेवर आहे. बोगस बियाण्याचा पुरवठा येथुनच होतो. व्यापाऱ्यांना सदर बियाणे कमी किंमतीत मिळते व शेतकऱ्यांना जास्त किंमतीत विकुन दाम दुप्पट कमाई असल्याने याचे विक्रेते दरवर्षी सक्रिय होतात. प्रत्येक हंगामात शेतकऱ्यांना बोगस बियाणं, बोगस खते, किटकनाशके या माध्यमातून नागवलं जातं. शेतकऱ्यांच्या घामाच्या दामाची लुट केली जाते. कापूस लागवडीचा हंगाम सुरू होत आहे. कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी बोगस बियाणे खते विकणाऱ्यांच्या मुसक्या शेतकऱ्यांची फसवणूक होण्याआधी आवळाव्यात अशी अपेक्षा शेतकऱ्यांतुन व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांनीही सावधानता बाळगावी, बियाणे विकत घेताना पक्के बिल घ्यायला पाहिजे, पक्के बिल घेतलं आणि दुर्दैवाने बियाणं बोगस निघालं तक्रार करता येईल,असे केल्याने फसवणूक करणाऱ्यांवर पायबंद बसेल. काहीही ना काही नुकसान भरपाई तुम्हाला मिळू शकते. त्यामुळे खते, बियाणं खरेदी केल्यानंतर पक्क्या बिलाचा आग्रह करुन ते बिल विकेत्याकडून घ्यावे, असे शेतकरी एकमेकांना सल्ला देत आवाहन करीत आहेत.

नवनाथ नगरात आजपासून कानुमाता उत्सव

■ **नंदुरबार । प्रतिनिधी**

शहरातील नवनाथ नगर भागातील चित्ते परिवारातर्फे कानुमाता उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्या दि .२७ मे रोजी कानबाई माता मिरवणूक आणि सायंकाळी लग्न तसेच मंगळवारी कानबाई माता विसर्जन मिरवणूक काढण्यात येईल.भगत,गवरणी आगमन, रास पूजन, गहू दळणे, पीठ गाळणे, माल रांधणे झाले.

कानबाई माता उत्सव धुळे येथील श्री महामंडलेश्वर पार्वती नंदगिरी यांच्या कृपाशीर्वादाने तसेच अमळनेर येथील दादू महाराज भगत यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. अमळनेर येथील दादू महाराज भगत यांचे शिष्य गण उपस्थित झाले आहेत.

दि. २७ मे रोजी सकाळी पाणी आणणे, ध्वज मिरवणूक, कुंभार, सुतार रत्न, कस्तुरी आणणे आदी उपक्रम होतील. सोमवारी सायंकाळी ४ वाजता श्री कानबाई माता मिरवणूक आणि सायंकाळी ७ वाजता श्री कानबाई माता लग्न लावणे. नारळ परणने, थाट भरणे, याच बरोबर सायंकाळी सात ते रात्री अकरा वाजेपर्यंत महाप्रसादाचे वितरण होईल.

दि.२८ मे रोजी सकाळी ८ ते १२ दरम्यान श्री कानुबाई मातेची विसर्जन मिरवणूक वाजत गाजत नवनाथ नगर येथून काढण्यात येईल. बालवीर चौक, महात्मा बसवेश्वर नगर, नवा भोईवाडामार्गे चव्हाण चौक, राणी लक्ष्मीबाई चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा, साक्री नाकामार्गे पाताळगंगा नदी येथे समारोप होईल.

भाविकांनी कानुबाई माता दर्शनाचा आणि प्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन चित्ते परिवारातर्फे करण्यात आले आहे.

किरकोळ कारणावरून एकास मारहाण

■ **नंदुरबार । प्रतिनिधी**

लोकांना शिवीगाळ करण्याऱ्या भावाला समजविण्याच्या राग आल्याने भावानेच भावाल मारहाण करण्यात आल्याची घटना नवापूर तालुक्यातील बोरचक गावात घडली आहे.

याबाबत वृत्त असे की, बोरचक येथील विलास धिरा नाईक हा रस्त्याने जा णाऱ्या येणाऱ्या लोकांना शिवीगाळ करीत होता. त्यास भाऊ विकास धिरा नाईक याने लोकांना शिवीगाळ करू नको, असे समजावून सांगितले. समजावून सांगितल्याच्या राग आल्याने विलास नाईक याने विकास नाईक मारहाण करून जखमी केले. विकस नाईक यांच्या फिर्यादीवरून पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवापूर येथे रंगावली नदीवर ठेकेदाराने केला भराव

ठेकेदाराच्या मनमानीपणामुळे नवापूर शहरावर संकट येण्याची शक्यता

■ **नवापूर । श.प्र.**

जीवनदायिनी असलेल्या रंगावली नदीवर पुलाचे बांधकाम सुरू आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहाच्या चौपदरीकरणाच्या कामात रंगवली नदीवरील पुलाचे काम सुरू आहे. पुलाच्या उभारणीसाठी ठेकेदाराने नदीपात्रात मुरुमाचा भराव केल्याने नदीपात्र बुजले गेले आहे. आता पावसाळा तोंडावर आला आहे. सदर भराव काढून पावसाळ्याचे पाणी वाहण्यास जागा झाली नाही तर पुराचे पाणी शहरात घुसून मोठी समस्या निर्माण होणार आहे. याबाबतीत पालिका प्रशासन व संबंधित रस्ता निर्माण ठेकेदार यांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

नवापूर हद्दीतील बेडकी ते फागणे हा राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम सुरू आहे. सदर काम अनेक वर्षांपासून कासवगतीने सुरू आहे. या कामाला कासवगती म्हणणे सुद्धा चुकीचे ठरेल इतक्या संथ गतीने रेंगाळत पणे काम होत आहे. या चौपदरीकरणात शहरातून वाहणाऱ्या रंगावली नदीवर भला मोठा उंच पूलाचे निर्माण होत आहे. या निर्माण कार्यात ठेकेदाराने त्यांच्या सुविधेसाठी रंगावली नदीपात्रात मुरुमाचा भराव

करून नदीपात्र सपाट केले आहे. पाणी वाहण्यासाठी लहान चिंचोळी आकाराची जागा व पाईप टाकून ठेवले आहेत.

सद्या सर्वत्र वारावादळासह बेमोसमी पाऊस पडत आहे. रंगावली नदीच्या उगमस्थानावर जर मुसळधार पाऊस झाला तर पुराचे पाणी नवापूर शहराकडे येणार यात शंकाच नाही. सदर पुराचे पाणी वाहून जाण्यासाठी पुरेसे नदीपात्र मोकळे नाही. खोकसा, नागझरी, प्रतापपुर, बोरझर, बोकळझर, रायपूर, धनराट, चौकी या भागात पावसाचे पाणी आल्यास ते सरळ नवापूर शहराकडे येते. दरवर्षी मे अखेर मुसळधार पाऊस पडतो या वर्षी ही पडेल यात शंकाच नाही. सदर पुलाच्या वरच्या बाजूला पालिकेने शहराला पाणीपुरवठा सुरळीत व्हावा यासाठी रंगावली नदीवर केटीवेअर बंधारा बांधला आहे. सदर बंधाऱ्यात साठवणूक क्षमतेपेक्षा जास्त पाणी साठा करता येत नाही. पर्यायी केटीवेअरचे दरवाजे खुले करावे लागतात. पाण्याचा प्रवाह जोरात सुरु झाल्यावर पाण्याला रस्ता मिळेल तिकडे वळण घेणार आणि नुकसान होणार ही बाब हळक्यावर घेण्याइतपत सोपी नाही. मात्र याबाबतीत पालिका प्रशासन स्वतः प्रशासक असूनही गंभीर नाही अथवा डोळेझाक करत आहे असे वाटते. रस्ता चौपदरीकरण करणारे ठेकेदाराने या बाबतीत गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. त्यांनी परिस्थितीची जाणीव असूनही दुर्लक्ष करतांना दिसत आहेत. एखाद्या मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहेत असेच एकंदरीत चित्र आहे. पालिका प्रशासन व ठेकेदार यांना गावाशी, गावकऱ्यांशी काहीएक देणंघेणं दिसत नाही. पालिका प्रशासन अधिकारी एकदोन वर्ष राहतील बदली होऊन निघून जातील, तर रस्ता निर्माण करणारे ठेकेदार यांचंही कधीतरी काम संपल की बोरबीस्तार आवरून दुसऱ्या ठिकाणी जातील, समस्येला व संकटाला तर नागरिकांना तोंड द्यावे लागेल.

> नदीपात्रात असलेला भराव मागील वर्षी देखील पावसाळ्यापूर्वी काढला होता, आताही जिल्हाधिकारी यांचे आदेश आले आहेत, लवकरच नदीपात्रातील भराव काढून नदी पात्र पूर्ववत करण्यात येईल.
>
> **– जे.एम.म्हात्रे**
> **ठेकेदार**

या सर्वांच्या परिणामाची झळा तर नवापूरकर व नदीकिनाऱ्यावर राहणाऱ्या नागरिकांना भोगावी लागेल. माणुसकी म्हणून तरी वेळेच्या आत नदीतील भराव काढून नदीपात्रात मोकळं करावे. नदीला व नागरिकांना मोकळा श्वास घेऊ द्यावा एवढीच माफक अपेक्षा आहे.

भाव, भक्ती आणि भक्तचा संगम भारतात : अविनाश जोशी

■ **शहादा । दि.२६ । ता.प्र.**

भाव, भक्ती आणि भक्त या तिघांसाठी भगवंत धावत येतो. भारतात हे तिन्हीचा वास असल्याने भगवंताने भारतात अवतार घेतला. मुलींच्या जन्माचे स्वागत करण्यासह वाढत्या तापमानाला रोखण्यासाठी सर्वांनी वृक्ष लागवडीवर भर द्यावा, असे मौलिक विचार भगवताचार्य वेदमूर्ती अविनाश जोशी (नंदुरबारकर) यांनी व्यक्त केले.

शहाद्यातील डोंगरगाव रोडवरील शांतीविहार नगर येथे श्रीमद् भागवत ज्ञानकथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. कथेचे निरूपण भगवताचार्य वेदमूर्ती अविनाश जोशी यांनी केले. श्री.जोशी म्हणाले की, राम समजणे सोपे आहे, पण कृष्ण समजून घेणे खूप कठीण काम. कथा हे शाश्वत धन आहे. भौतिक धन कितीही कमावले तरी जाताना सुद्धा शेवटी ते नेता येत नाही. भागवत हे मृत्यू मंगल करणारे शास्त्र आहे. सर्वांना अशाश्वत येथेच सोडून जायचे आहे. आपल्यातील धनाचा हव्यास कमी होत नाही. परमार्थ साधनाचे धन, परमेश्वर भक्ती, दान व सत्कर्म हेच शेवटी उपयोगी येते. भविष्यात श्रद्धेचा व्यापार व्हायला नको म्हणून संतांनी त्यावेळी ग्रंथाद्वारे सूचित केले आहे. भगवंताच्या नामस्मरणाने नवचैतन्य प्राप्त होत असते.

सध्याच्या वाढत्या तापमानावर ते म्हणाले की, सर्वत्र वृक्ष कमी झाल्याने तापमानात वाढ झाली आहे. त्यामुळे प्रत्येकाला त्रास होत आहे. शासनाला जे करायचे ते करेल. परंतु त्यांची वाट न पाहता प्रत्येकाने आता सुरुवात करायला हवी. आपल्या घराबाहेर, ओपन प्लेस, शेतात झाडांची रोपे लावा आणि वृक्ष संवर्धन करा. त्यात कडूलिंब जास्त असावेत. शेताच्या बांधावर एक तरी झाड लावा व त्याला वाढवा. तर कन्या जन्माबद्दल बोलतांना ते म्हणाले की, सध्या सर्वच समाजातील कन्या जन्मदर कमी आहे. जन्म आधीच तिला खुडतात. मात्र शाश्वत भागवतात ज्यांच्याकडे लेक जन्माला आली ते भाग्यवान आल्याचे सांगितले आहे. यापुढे सर्वांनीच मुलीच्या जन्माचे स्वागत केले पाहिजे. कन्या जन्मामुळे आपल्याला समाजाभिमुख कसे जगावे हे कळते.

शक्ती हनुमान मंदिरात भाविकांनी घेतला महाप्रसाद

■ **नंदुरबार । दि.२६। प्रतिनिधी**

शहरातील सीबी गार्डन जवळील लालबहादूर शास्त्रीनगर येथील श्री शक्ती हनुमान मंदिरात मंगळवारी असंख्य भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

लालबहादूर शास्त्री नगरात यापूर्वीच श्री शक्ती महादेव व कार्तिक स्वामींचे मंदिर उभारण्यात आले आहे. याच मंदिराशेजारी आता शक्ती हनुमान मंदिर उभारण्यात आले आहे. शहरातील सर्वप्रथम संगमरवरी १५ फुटाची हनुमान मूर्ती भाविकांचे श्रद्धास्थान ठरले आहे. दर मंगळवारी आणि शनिवारी शक्ती हनुमानाचे दर्शन घेण्यासाठी भाविक मोठ्या प्रमाणावर हजेरी लावत आहेत. मंगळवारी देखील मोठ्या प्रमाणावर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. शक्ती हनुमान मंदिराचे संयोजक तथा वाघोदा येथील पोलीस पाटील सुरेश भोई यांच्या मार्फत संयोजन करण्यात येत आहे.

मोलगी परिसरात पावसाळ्यापूर्वी घरांच्या दुरुस्तीला वेग

■ **मोलगी ता.अक्कलकुवा । दि.२६। वार्ताहर**

अलीकडच्या काळात सिमेंटच्या घरांचे प्रमाण वाढले असले तरी सातपुड्याच्या ग्रामीण तसेच दुर्गम भागात मातीपासून तयार करण्यात आलेल्या कौलारू घरांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. पावसाळा जवळ आल्याने गेल्या काही दिवसांपासून अशा कौलारू घरांची डागडुजी करण्याचे काम अनेकांनी हाती घेतले आहे. त्यामुळे या भागात सर्वत्र कौलारू घरांची दुरुस्तीची लगबग सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे.

अलीकडे सिमेंटच्या घरांची क्रेज वाढल्याने अशा घरांचे प्रमाण वाढले असले तरी नंदुरबार जिल्ह्यातील विशेषतः सातपुड्याच्या ग्रामीण व दुर्गम भागात आजही कुडाची व शेण मातीने सारवलेली घरे मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. सातपुड्याच्या अतिदुर्गम भागात तर सर्वत्र माती पासून तयार केलेली झोपडी किंवा कौलारू घरचं नजरेस पडतात. पुढच्या महिन्यात पावसाळ्याला सुरुवात होणार आहे. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी अशा घरांची दुरुस्ती करणे गरजेचे असल्याने, सध्या ग्रामीण भागात घरांची दुरुस्ती करतांना दिसून येत आहेत.

सातपुड्याच्या ग्रामीण किंवा अतिदुर्गम भागात जवळपास सर्वच घरे ही कौलारू व बांबू कुडाची शेण मातीने सारवलेली असतात. पावसाळा जवळ आल्याने अश्या अशा घरांची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने, ग्रामीण भागात कौलारू घरांची दुरुस्ती करण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. मात्र कौलारू घरे दुरुस्त करण्याचा अनुभव खूप कमी लोकांना असल्याने, संबंधित लोकांची मनधरणी करताना घरमालकाच्या नाकीनऊ येत असल्याचे चित्र बघावयास मिळत आहे. त्यामुळे घर मालक स्वतः कुटुंबाचा मदतीने प्रसंगी नातेवाइकांच्या मदतीने घराची दुरुस्ती करीत असल्याचे दिसून येत आहे. दुरुस्ती दरम्यान गाळ-मातीसह जीर्ण लाकूड बदलून,छतावरील कौलांची दुरुस्ती करण्यात येत आहे. प्रसंगी घरावर नवीन कौल लावणे व मोडकळीस आलेले लाकडी फाटे नव्याने बसविणे आदी कामे करण्यात येत आहेत.

असे तयार होते घर

सातपुड्याच्या ग्रामीण व दुर्गम भागातील घरे ही माती व लाकडापासून तयार होतात. अशा घरांचा वरती बांबूची चपटे असतात आणि त्यावर मातीचे कौल घरांची भिंत तयार करण्यासाठी बांबूच्या चापट्या पासून बनविलेले तट्टे (कुड) वापरण्यात येतात,आता यासाठी कापसाच्या काड्यांचा वापर देखील करण्यात येत आहे. त्यावर माती, शेणाने सारवले जाते आणि मग आकर्षक असे घर तयार होते.

मातीच्या घरांचे आकर्षण वाढले –

सातपुड्याच्या परिसरात व पायथ्याशी असलेल्या विविध भागांमधील आदिवासी समुदायांची पारंपारिक घरे ही माती, शेण व कौलारू असतात आणि त्यांची रचना काँक्रीटच्या घरांपेक्षा चांगली असते.

या मातीच्या घरात आरामदायक जीवन असते. शेणाने घराला सारवणे हे आरोग्यासाठी खूपच महत्त्वाचे असते आणि यामुळे अनेक रोगांपासून बचाव होतो. असे आदिवासी जाणकार म्हणतात. त्यामुळे आता सर्वत्र मातीपासून तयार केलेल्या घरांचे आकर्षण वाढले आहे.

> या वर्षी उन्हाळा ४४ ते ४५ अंशा पर्यंत तापमान वाढल्याने लोकांना सिमेंटच्या घरातील उकाळ्यात राहणे कठीण होत असतांना ग्रामीण भगातील कौलारू आणि कुडाच्या घरात राहणाऱ्या लोकांना मात्र याची झळ बसत नाही. कौलारू आणि कुडाची घरे ही हवेशीर असतात.
>
> **– ऋजोब्या वळवी**
> **रहिवासी असली ता.धडगाव**

शॉर्ट न्यूज

आता मतमोजणीची प्रतीक्षा

■ धुळे । प्रतिनिधी

धुळे लोकसभा मतदारसंघात ६०.२१ टक्के मतदान झाले आहे. मतमोजणी केवळ आठ दिवसावर येवून ठेपल्यामुळे शहरासह ग्रामीण भागात कोण निवडून येणार यावर खल होत आहे. अनेकांनी यासाठी पैजही लावली आहे. अनेक कार्यकर्ते मतमोजणीच्या ठिकाणी जाण्यास मिळावे, यासाठी उमेदवाराकडे फिल्डींग लावत आहेत. मतमोजणीत कोण बाजी मारणार? कोण खासदार होणार? यावर कार्यकर्त्यांमध्ये चांगलाच खत होत आहे. आपलाच नेता निवडून यावा, त्यांच्यासाठी आपण एक महिना प्रचार केला आहे. असे कार्यकर्ते विश्वासाने सांगत आहेत. प्रशासकीय यंत्रणा देखील मतमोजणी सुलभ व्हावी, यासाठी नियोजन करीत असून कर्मचाऱ्यांची नियुक्तीही प्रशासनाने केली आहे. कर्मचाऱ्यांना मतमोजणीबाबत प्रशिक्षणही देण्यात आले आहे.

खरीपासाठी शेतकऱ्याला मिळणार अनुदान तत्वावर बियाणे

महाडिबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

■ कुरखळी। वार्ताहर

खरिप हंगाम जवळ येऊन ठेपला आहे. शेतकऱ्याने मशागत करुन पेरणी योग्य शेत तयार करुन ठेवले आहे. पाऊस पडताच पेरणीची लगबग सुरु होणार आहे. त्यासाठी लागणाऱ्या बियाणाचे नियोजन शेतकरी करत आहे.त्यातच शिरपूर कृषी विभागाणे विविध पिकांच्या बियाणांचे वाटप करण्यासाठी महाडिबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन केले आहे.या योजनेचा लाभ मिळणार असल्याने शेतकऱ्यांना दुष्काळसदृष परिस्थितीत काहीसा दिलासा मिळणार आहे.

महाराष्ट्र कृषि विभागामार्फत पिक प्रात्यक्षिकांतर्गत व प्रमाणित बियाणे अंतर्गत शेतकऱ्यांना विविध पिकांच्या बियाणांचे वितरण करण्यात येते. त्यासाठी महाडीबीटी पोर्टल वर शेतकऱ्यांनी अर्ज

करणे आवश्यक आहे.

पिक प्रात्यक्षिकमध्ये निवड झालेल्या शेतकऱ्यांना एका एकरासाठी लागणारे बियाणे मोफत मिळणार आहे तर प्रमाणित बियाणे वितरण योजनेत निवड झालेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या अर्ज केलेल्या क्षेत्रानूसार जास्तीत जास्त पाच एकर क्षेत्रासाठी लागणारे बियाणे ५० टक्के अनुदानावर मिळणार आहे.या योजनांतर्गत सोयाबीन,भूईमूग,तूर,मका ई. बियाण्यांसाठी अर्ज करता येणार आहे. तरी शेतकऱ्यांनी सीएससी केंद्रावर जाऊन महाडिबीटी पोर्टलच्या संकेतस्थळावर आपल्याला लागणाऱ्या बियाणाचा अर्ज करता येणार आहे.

या बियाण्यासाठी अनुदान

महाराष्ट्र शासनाच्या या योजनांतर्गत ज्वारी,बाजरी, सोयाबीन,भूईमूग, उडीद,तूर,मूग इत्यादी पिकाचे बियाणे शेतकऱ्यांना मिळणार आहे.प्रमाणित बियाणे वितरण योजनेत निवड झालेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या अर्ज केलेल्या क्षेत्रानूसार जास्तीत जास्त पाच एकर क्षेत्रासाठी लागणारे बियाणे ५० टक्के अनुदानावर मिळणार आहे.

असा करा अर्ज

या योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणत्याही शेतकऱ्यांला अर्ज करता येणार आहे. अर्जदार शेतकऱ्यांना जुनच्या पहिला किंवा दुसऱ्या आठवड्या अखेर पावतो बियाणाचे वितरण केले जाईल. महाडिबीटी पोर्टललवर या पुर्वी कोणत्याही योजनेसाठी अर्ज केलेला असेल तर फक्त लॉंगिन करुन अर्ज भरता येणार आहे.तर पोर्टलवर शेतकरी नविन अर्ज करणार असेल तर सातबारा, आठ अ, बँक पासबुक, आधारकार्ड झेरॉक्स आवश्क असणार असल्याचे तालुका कृषी अधिकारी संजय पवार यांनी सांगितले.

संत सेनाजी महाराज जीवन चरित्र, अभंग गाथेचे प्रकाशन

■ बोराडी । वार्ताहर

संत सेनाजी महाराज जीवन चरित्र व अभंग गाथा ग्रंथ प्रकाशन सोहळा ऑल इंडिया सेनजी महासंघ ट्रस्टचे संस्थापक एम. एस. ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली धुळे शहरातील गरुड वाचनालय हॉलमध्ये संपन्न झाला.

या कार्यक्रमाला हिरालाल ठाकरे, दिलीप येशी, अनिल बोरुडे, प्रा.डॉ. ज्ञानेश्वर वाघ, ॲड. किशोर जाधव, युवराज वारूडे, लेखक भगवान चित्ते आदी उपस्थित होते.या प्रसंगी दीपप्रज्वलन करून गौतम बुद्ध, विनयपती उपाली, संतश्रेष्ठ सेनाजी महाराज, शिवरक्षक जिवाजी महाले, शहीद भाई कोतवाल या महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले. लेखक भगवान चित्ते यांनी प्रास्ताविक केल्यानंतर संत सेनाजी महाराज जीवन चरित्र व अभंग गाथा ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी रामचंद्र रतिलाल येशी (जिल्हाध्यक्ष, ऑल इंडिया सेनजी महासंघ, धुळे) (उपाध्यक्ष, महाराष्ट्र नाभिक महामंडळ, धुळे) यांच्या अनेक वर्षांच्या समाजकार्याची दखल घेवून लेखक भगवान चित्ते यांनी नाभिक मंच परिवारातर्फे त्यांना समाजभूषण या पुरस्काराने सन्मानित केले. सदर पुरस्कार कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख अतिथींच्या हस्ते त्यांना देण्यात आला. याप्रसंगी शिरपूर शहरातील रामचंद्र नारायन पवार, विकास सेन, गोपाल वरसाडे, रविंद्र सोनगिरे, संजय वरसाडे, महिला जिल्हा अध्यक्षा हेमलता येशी, महाराष्ट्र नाभिक महामंडाळाचे सचिव बि .के सुर्यवंशी, विशाल चित्ते, मोगलाई परिसराचे अध्यक्ष प्रविण सैंदाणे, लक्ष्मण बोरसे, दिनेश महाले ,धुळे जिल्हा दुकानदार संघटनेचे अध्यक्ष रविंद्र सैंदाणे, नरेंद्र खोडे, विजय सैंदाणे आदी उपस्थित होते.

मालपूर येथे संत भिमा भोई यांना अभिवादन

■ शिरपूर । प्रतिनिधी

तालुक्यातील मालपूर येथे संत भिमा भोई यांच्या जयंती निमित्त प्रतिमा पूजनाचा कार्यक्रम भोई समाजातर्फे घेण्यात आला. यावेळी मिरवणूक भोई समाज मंगल कार्यालय, राममंदिर, शिवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, मारोती मंदिर, ग्रामपंचायत चौक या मार्गाने काढण्यात आली.

संत भीमा भोई यांच्या प्रतिमेचे पुजन धुळे जिल्हा परिषदेचे माजी सभापती महावीरसिंह रावल, धुळे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य हेमराज पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मालपूर माजी उपसरपंच भारतीबाई वाडीले, माजी उपसरपंच प्रकाश पाटील, शांतराम तावडे, पत्रकार सदाशिव भलकार, श्रावण अहिरे, भटु रावल , सुभाष ठाकरे ,कैलास पाटील, उखडू वाडीले,बळीराम वाडीले,नाना शिवदे,उत्तम तावडे, दगा तावडे,मगन शिवदे,योगेश वाडीले, दिनेश मोरे, पांडू मोरे,अरुण तावडे, आसाराम धनराळे,छोटू मोरे, राजू वाडीले, रविंद्र वाडीले, विरेंद्र पवार, आदी मान्यवर उपस्थित होते.

शिरपूर भाजपा कार्यालयात संत श्री. भिमा भोई यांची जयंती

■ शिरपूर । प्रतिनिधी

भोई समाजाचे आराध्यक्ष दैवत संत शिरोमणी श्री. भिमा भोई यांची जयंती साजरी करण्यात आली.

शिरपूर भाजपा कार्यालयात संत श्री. भिमा भोई यांचे प्रतिमा पूजन धुळे भाजपा जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी यांचा हस्ते करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी धुळे भाजपा जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी यांनी मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी जिल्हा सरचिटणीस अरुण धोबी, तालुकाध्यक्ष किशोर माळी, तालुका प्रभारी हेमंत पाटील, भाजपा भटके विमुक्त आघाडी प्रदेश उपाध्यक्ष रविंद्र भोई, भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस संजय आसापुरे, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत चौधरी, शहर उपाध्यक्ष अनिल बोरसे, शिरपुर भाजपा शहर चिटणीस राधेश्याम भोई, किसान मोर्चा तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, संत श्री. भिमा भोई जयंती उत्सव समिती अध्यक्ष प्रविण मोरे, सचिव आकाश सोनवणे, महासचिव राजेश्वर भोई, भोई समाजाचे युवा नेते दीपक भोई, बोराडी डी. डी. सी. बँक मॅनेजर रविंद्र भोई, अनिल भोई, दिपक धनगर, हरिष भोई, निलेश भोई, मयुर भोई, अजय भोई, गोलु भोई, निलेश भोई, नरेश भोई, आकाश भोई, दिपक भोई, गणेश भोई, गोपाल भोई, बंटी भोई, कल्पेश भोई, भुषण वाडीले, सचिन सोनवणे, जितेंद्र भोई, सोनु भोई, राज भोई, हरिष भोई, छोटु भोई, कन्हैया भोई, भिका भोई, निलेश भोई आदि उपस्थित होते.

शिरपूर येथे बौद्ध पौर्णिमेनिमित सामुहिक वंदना

■ शिरपूर । प्रतिनिधी

शहरातील खालचे गाव बौद्धवाडा येथे विश्वाला शांततेचा संदेश देणारे, विश्वदीप भगवान गौतम बुद्ध यांच्या २५६८ व्या जयंतीनिमित्त आणि वैशाख त्रिगुणी पावन बौद्ध पौर्णिमा निमित्त सामुहिक वंदना करण्यात आली.

गणेश सावळे, पिंटू शिरसाट, बापू थोरात, बाबुदादा खैरनार, प्रा. राजु पवार, किरण करणे, मंगळे रावसाहेब, अनिल बाविस्कर, प्रताप सरदार, मुकुंद बैसाणे, डॉ. नितीन निकम, बौद्ध महासभेचे शिरपूर अध्यक्ष अशोक ढिवरे यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आली. प्रबुद्ध शिरसाट यांनी विधिसंचलन त्रिसरण, पंचशील, बुद्धवंदना, धम्मवंदना, संघवंदना आशीर्वाद गाथा,

सामूहिकरीत्या घेतली. सुरुवातीला सुनील बैसाणे यांनी त्रिगुण पावन बौद्ध पौर्णिमेचे महत्त्व विशद करणारी माहिती दिली व बुद्धांच्या जीवनावर प्रकाश टाकला. पाली भाषा अध्ययन वर्ग देखील यानिमित्ताने शिरपूर शहरात सुरू होईल अशी माहिती दिली. या प्रसंगी खीर दान व बुद्ध-वंदना पुस्तकाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास प्रताप देवरे, बन्सीलाल शिरसाट, मारुती वाल्हे, बापू इंदासे, जितेंद्र भदाणे, शौकीन कुवर, विक्की ढिवरे, कल्पनाताई खैरनार, वंदना खैरे, दत्तू थोरात, सुरेंद्र मोरे, राहुल थोरात, मिलिंद शिरसाट, हिम्मत सैंदाणे, गौतम थोरात, ब्रिजेश थोरात, सुधीर थोरात, महेंद्र पवार, आगळे, ॲड. योगेश शिरसाठ, विश्वास शिरसाठ आदी उपस्थित होते. मिलिंद शिरसाठ यांनी आभार मानले. प्रास्ताविक विजयानंद शिरसाट यांनी केले.

विफा सब ज्युनियर बॉईज स्टेट फुटबॉल चॅम्पियनशिप स्पर्धांना सुरुवात

■ शिरपूर । प्रतिनिधी

श्री विलेपार्ले केळवणी मंडळ मुंबई संचलित तांडे ता. शिरपूर येथील मुकेश पटेल सीबीएसई निवासी स्कूलच्या मैदानावर विफा सब ज्युनियर बॉईज स्टेट फुटबॉल चॅम्पियनशिप स्पर्धांना शानदार सुरुवात झाली.

विफा सब ज्युनियर बॉईज स्टेट फुटबॉल चॅम्पियनशिप २०२४ चे आयोजन श्री विलेपार्ले केळवणी मंडळ मुंबई आणि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन यांच्या वतीने करण्यात आले आहे. २३ मे ते २९ मे २०२४ दरम्यान अतिशय चुरसीचे सामने सुरु झाले आहेत. या राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून एकूण ३२ जिल्ह्यांमधून सुमारे ७०० पेक्षा जास्त खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. यावेळी संपूर्ण महाराष्ट्रातून फुटबॉल संघांसह त्यांचे अधिकारी कोच व इतर मान्यवर सहभागी झाले आहेत.

विफा सब ज्युनियर बॉईज आंतर जिल्हा फुटबॉल चॅम्पियनशिपचे उद्घाटन मुकेश पटेल सीबीएसई निवासी

स्कूलच्या भव्य मैदानावर झाले.

श्री विलेपार्ले केळवणी मंडळ मुंबई संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरीशभाई पटेल, संस्थेचे सह-अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री विलेपार्ले केळवणी मंडळ व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी यांच्या हस्ते श्री गणेश मूर्ती, सरस्वती माता मूर्ती व माजी खासदार मुकेश पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन बलून आकाशात सोडून स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी स्कूलचे लोकल पर्चेस कमिटी मेंबर यशवंत बाविस्कर, स्कूलचे लोकल पर्चेस कमिटी मेंबर विजय अग्रवाल, शिरपूर एज्युकेशन सोसायटी सीईओ डॉ. उमेश शर्मा, विफा रेफरी बोर्ड चेअरमन धनराज मोरे, एआरपी सीबीएसई स्कूल प्राचार्य आर.के.राव, शिरपूर तालुका क्रीडा अधिकारी एम.के. पाटील, विफा मुख्य लेखापाल श्री. भूषण, विफा राज्य विकास व्यवस्थापक श्री. नंदन, विफा निवडकर्ता शमसुद्दीन कादिर, विफा निवडकर्ता राहुल बांते, एस.व्ही.के.एम. संस्था क्रीडा संचालक किरण अंचन, स्कूल सहाय्यक क्रीडा संचालक डॉ. आशिष शुक्ला आदी उपस्थित होते.

वृद्ध दाम्पत्य घरात आढळले मृतावस्थेत

■ धुळे । प्रतिनिधी

शहरातील वलवाडी शिवारात वृद्ध दाम्पत्य घरात मृतावस्थेत आढळून आल्याने खळबळ उडाली आहे.

वलवाडी शिवारातील राका हाऊसिंग सोसायटीत राहणारे नागराज दामू भामरे (७४) व त्यांची पत्नी शोभाबाई नागराज भामरे (६६) हे आज सकाळी घरात मृतावस्थेत आढळले. गेल्या दोन दिवसांपासून त्यांनी घराचा दरवाजा उघडलेला नव्हता. पुणेस्थित त्यांच्या मुलाने काल रात्री आई-वडिलांना फोन केला; मात्र त्यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने आज नातेवाईकांनी बंद घराचा दरवाजा तोडला असता दोन्ही जण मयतावस्थेत मिळून आले. सदर वृद्ध दाम्पत्य एकटेच राहत होते. त्यांना दोन मुले, दोन मुली असून ते बाहेरगावी स्थायिक आहेत. नागराज भामरे हे मुळचे मेहेरगाव येथील असून दोघांच्या मृत्यूचे कारण समजलेले नाही. पोलिसांनी वृद्ध दाम्पत्याचे मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी हिरे रूग्णालयात दाखल केले असून उशिरापर्यंत पोलीस ठाण्यात नोंद घेण्याचे कामकाज सुरू होते.

लग्नसराईनंतर आता ग्रामीण भागात आमरसाचा बेत

■ वालखेडा । वार्ताहर

लग्नाच्या हंगाम संपला आहे .खरीप हंगामाची शेतातील कामे जवळ पास झाली असली तरी सघ्या ग्रामीण भागामध्ये या वेळेस आमरसाचे मोठया प्रमाणात बेत सुरु आसून त्यात शेती, पाणी,दुष्काळा व लोकसभा मतदानावर वर चर्चा होतांना दिसून येत आहे.

में महिन्यामध्ये बाजारात आंबे मोठया प्रमाणात दाखल होतात. लग्नसराई झाल्यानंतर आमरसाचा बेत आखला जातो. या वेळी नवीनच लग्न झालेल्यांना या जेवनासाठी आमंत्रण दिले जाते.पूर्वी मोठया प्रमाणात शेतामध्ये गावटी आंब्याचे झाडे राहत असे आणि ते आंबे खाण्यासाठी चवदार लागत असे.त्यामुळे मोबलक आंब्याचे उत्पादन येत असे. त्यामुळे नवीन झालेल्या नातेवाईकांना कच्चा किंवा पिकलेला आंबे वानोळा म्हणून देत असे.परंतु

जसजसा शेतीचा विकास होत गेला आणि पिकासाठी अडथळा करणारे बांधावरील आंब्याची झाडे काढण्यात आली. त्यामुळे अगदी बोटावर मोजता येणार एवढी आंब्याची झाडे बघाव्यास मिळतात .परन्तु चालु वर्षी आब्याच्या झाडाना मोठया प्रमाणात मोहर आलेला होता. त्यामुळे आंब्याचे उत्पादन मोठया प्रमाणात येईल, असे वाटत असतांना आंबे ऐन मोसमात असताना गारपिटसह आवकाळी पावसामुळे कच्च्या कैरीचे गारा व वाऱ्यामुळे नुक़सान झाले .त्यामुळे गावठी आब्याच्या उत्पादन घटले.तेव्हा माहगडी आंबे घ्यावी लागत आहे.

मे महिना म्हटला की शेतकऱ्यांची शेततील सर्व कामे झालेली असतात.सततच्या कामाच्या व्यापामुळे कधी न येणारे पाहुनेही शेतात कामे आटोपल्याने आमरसाच्या जेवणाला हजरी लावत आहेत.

या जेवणासाठी जमलेल्या पाहुण्यामध्ये मग झालेला अवकाळी पाऊस, गारपीटीमुळे झालेल्या पिकाचे नुक़सान, पिण्याच्या पाणी, चारा आदि विषयवर चर्चा होत आहे. चालु वर्षी पाऊस वेळेवर येईल का? जर वेळेवर पाऊस नाही आला तर आणि पेरणी वेळेवर न झाल्यास पुढच्या पिकाचे नियोजन होईल का अशा असंख्य प्रश्नांवर चर्चा होत आहे. त्यात लोकसभा निवडणूकीवरचर्चा रंगू लागल्या आहेत.चालू वर्षी कांदयाला भाव नसल्यामुळे शेतकरी वर्ग नाराज आहे. त्यामुळे कांदयाच्या भावावर जास्त प्रमानात चर्चा होत आहे.

गडकरींना पाडण्यासाठी फडणवीसांनी रसद पुरवली!

संजय राऊतांनी लेखात भाजपावर केले गंभीर आरोप

मुंबई । वृत्तसंस्था

उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भारतीय जनता पक्षाबाबत गंभीर दावे केले आहेत. या दाव्यांना आता भाजपाकडून प्रत्युत्तर देण्यात आले आहे. भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांच्या अधिकृत एक्स हँडलवर यासंदर्भात भूमिका स्पष्ट केली आहे. त्याशिवाय, सुधीर मुनगंटीवार यांनीही संजय राऊतांना प्रत्युत्तर दिले आहे. त्यातच गडकरींना पाडण्यासाठी फडणवीसांनी रसद पुरवली होती, या आरोपावर काँग्रेस नेते विकास ठाकूर यांनीही संताप व्यक्त केला आहे.

काय आहे राऊतांच्या लेखात?

संजय राऊतांनी लिहिलेल्या लेखामध्ये करण्यात आलेल्या दाव्यांचे पडसाद महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात उमटू लागले आहेत. गडकरी यांचा नागपुरात पराभव व्हावा यासाठी मोदी-शाह-फडणवीसांनी एकत्र प्रयत्न केले. गडकरींचा पराभव होत नाही याची खात्री पटल्यावर फडणवीस हे नाइलाजाने नागपुरात प्रचारात उतरले. गडकरींच्या पराभवासाठी सर्व प्रकारची रसद फडणवीस यांनीच पुरवली हे संघाचेच लोक नागपुरात उघडपणे बोलताना दिसतात, असे संजय राऊत यांनी लेखात म्हटले आहे. तसेच, आता भाजपाचे सरकार आले तर अमित शाह योगी आदित्यनाथ यांना घरी पाठवतील, असा दावाही राऊतांनी केला आहे.

बावनकुळेंचं खोचक प्रत्युत्तर

दरम्यान, चंद्रशेखर बावनकुळेंनी यावर खोचक शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे. उबाठाचे अधिकृत आणि शरद पवार गटाचे स्वयंघोषित प्रवक्ते संजय राऊत यांनी आज पुन्हा अकलेचे तारे तोडत भाजपच्या अंतर्गत राजकारणावर भाष्य केले आहे. राऊत हे उद्धव ठाकरे यांचे कर्मचारी आहेत पण ते शरद पवार यांची चाकरी करतात. ते भ्रमिष्ट अवस्थेत रोखठोक लिहित असावेत. भाजप हा पक्ष नाही तर परिवार आहे. ज्यांनी आयुष्यभर गटातटाचे राजकारण केले त्या संजय राऊतांना परिवार काय कळणार? असा सवाल बावनकुळेंनी केला आहे.

दरम्यान, फडणवीसांनी रसद पुरवल्याच्या दाव्यावर नागपूरपमधील गडकरींच्या विरोधातील काँग्रेसचे उमेदावार विकास ठाकरे यांनी टीका केली आहे. भाजपाशी त्यांचं काय दुखणं आहे ते त्यांनी निपटावं. पण महाविकास आघाडीचं बंधन त्यांनी पाळावं. नाहीतर राऊतांच्या विरोधात आम्ही खूप बोलू शकतो. एवढंच होतं तर त्यांनी गडकरींसोबत युती करून वेगळी महाविकासआघाडी करायची होती, अशी प्रतिक्रिया विकास ठाकरे यांनी दिली आहे.

राऊतांना हे व्यसन - मुनगंटीवार

संजय राऊतांना आधी खोटं बोलायची सवय होती. आता ते व्यसन झालंय. आमच्या पक्षात मीठ कालवता येईल का हा प्रयत्न ते करत आहेत, अशा शब्दांत भाजपा नेते सुधीर मुनगंटीवार यांनी संजय राऊतांना लक्ष्य केले आहे.

४ जूननंतर संजय राऊतांचे थोबाड फुटलेले दिसेल -प्रविण दरेकर

मुंबई । वृत्तसंस्था

४ जूननंतर संजय राऊत यांचं थोबाड फुटलेले दिसेल, अशी टिका भाजप नेते प्रविण दरेकर यांनी केली आहे. संजय राऊतांनी आपल्या पक्षाची, आपल्या घराची काळजी करावी, हा देश मोदींच्या नेतृत्वाखाली चालेल, असं म्हणत संजय राऊतांवर प्रवीण दरेकरांनी पलटवार केला आहे.

भाजप नेते प्रविण दरेकर म्हणाले की, ४ जूननंतर संजय राऊतांचं थोबाड फुटलेलं आपल्याला दिसेल. कारण योगी आदित्यनाथ यांनी देशाची गरज मोदी आहेत, देशाच्या भविष्यासाठी मोदींची गरज आहे. हे जाहीर सभांमधून अगदी ठणकावून सांगितले आहे. त्यामुळे मोदी-योगी असे चित्र उभे करू नका. संजय राऊत तुम्ही आपल्या पक्षाची आपल्या घराची काळजी करा. हा देश, आमचा पक्ष मोदींच्या नेतृत्वाखाली चालेल, हे सर्वश्रुत आहे. संजय राऊत भ्रमिष्ट झालेत म्हणून अशा प्रकारच शोधून शोधून, काही काढून प्रसिद्धीत राहण्याचा आणि नौटंकी करण्याचा प्रयत्न करतात.

सामनाच्या दाव्याला आम्ही काडी मात्र किंमत देत नाही. गडकरींच्या संदर्भातले वक्तव्य म्हणजे, संजय राऊतांचा मूर्खपणाचा कळस. कारण प्रचारात राज्यभर व्यस्त असताना सुद्धा देवेंद्र फडणवीस यांनी आणखी विजय भक्कम व्हावा, यासाठी काय योगदान दिलं आहे ते नागपूरवासियांना माहीत आहे. संजय राऊत यांची दुटप्पी भूमिका आहे. अगोदर बोलायचं विरोधात रसद पुरवली, नंतर बोलायचं प्रचारात उतरले, संजय राऊत टीका करताना सुद्धा काय नेमकं बोलायचंय, हे निश्चित करून घ्या., असे प्रविण दरेकर म्हणाले आहेत.

अजित पवारांचा एकही उमेदवार निवडून न येण्यासाठी शिंदेंकडून कारस्थान -संजय राऊत

मुंबई । वृत्तसंस्था

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकसभा निवडणुकीत पैशाचा अफाट वापर केला. प्रत्येक मतदारसंघात त्यांनी किमान २५ ते ३० कोटी रुपये वाटले. पुन्हा अनेक उमेदवार पाडण्यासाठी वेगळे बजेट. अजित पवार यांचा एकही उमेदवार निवडून येऊ नये यासाठी शिंदे व त्यांच्या यंत्रणेने खास प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप शिवसेना खासदार संजय राऊत यांनी केला आहे.

राऊत यांनी शिंदेंनी अजितदादांविरोधात कारस्थाने केल्याचा आरोप केला आहे. राऊत यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्राच्या राजकारणात आलेल्या या समृद्धीने अनेकांचे डोळे दिपले. विचारांवर चालणारा महाराष्ट्र निवडणूक पैशांच्या धुरळ्यावर चालला. लोकांनी पैसे घेतले भ्रष्टाचारातून निर्माण झालेले सरकारने शेवटी जनतेला भ्रष्ट केले, असा आरोप राऊत यांनी रोखठोक सदरातून केला आहे. राऊत यांनी म्हटले आहे की, विचारांवर चालणारा महाराष्ट्र या निवडणुकीत पैशांच्या धुळ्यावर चालला लोकांनी पैसे घेतले भ्रष्टाचारातून निर्माण झालेल्या सरकारने शेवटी जनतेलाही भ्रष्ट केले. त्याचे आज कोणालाही काही वाटेनासे झाले. मोदी शहांच्या राजकारणाने महाराष्ट्राचे केलेले हे अध: पतन. तरीही महाराष्ट्र विकला जाणार नाही. किमान ३२ जागांवर मोदी शहा मित्रमंडळाचा पराभव होईल. महाविकास आघाडीने झंझावात उभा केला. त्यामुळे मोदी फडणवीस शिंदे हे उडून गेले. अमित शहांची दखलही महाराष्ट्राने घेतली नाही. महाराष्ट्रात पैशांचे राज्य या लोकांनी निर्माण केले. तोच महाराष्ट्र दिल्लीतील पैशांचे राज्य उखडून फेकेल. बदल नक्की होतोयय. मोदींच्या बोलण्यातला, वागण्यातला जोर ओसरला हे दिसत आहे. २०१९ ची निवडणूक पुलवामा हत्याकांडातील जवानांच्या बलिदानामुळे मोदींनी जिंकली. २०२४ ची निवडणूक मोदींच्या त्याच जवानांच्या शाप तळतळाट यामुळे हरत आहेत. जवानांचे आत्मे भटकत होते, ४ जूनला त्यांना मोक्ष प्राप्ती होईल.

६ जूननंतर आमच्याकडे इनकमिंग सुरू होणार, शिरसाटांचा दावा

मुंबई । वृत्तसंस्था

राज्यात सध्या सर्वांचं लोकसभा निवडणुकीच्या निकालाकडे लक्ष आहे. राज्यातील महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यात खरी लढत होती. त्यामुळे महाराष्ट्रातून दिल्लीत कोणाचे सर्वाधिक खासदार जाणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर सर्वांना विधानसभा निवडणुकीचे वेध लागणार आहेत. यासाठी मोठ्या प्रमाणात पक्षांतर होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी मोठा दावा केला आहे.

संजय शिरसाट म्हणाले, ६ जूननंतर आमच्याकडे इनकमिंग सुरू होईल. त्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या संपर्कात अनेकजण आहेत. माझ्याही संपर्कात आहेत. आमच्याच नियमित चर्चाही होतेय. योग्यवेळेला योग्य निर्णय घेण्याची शिंदेंची स्ट्रॅटेजी आहे. त्यानुसार ते निर्णय घेतील.

दरम्यान, या काळात अजित पवार यांच्याकडेही मोठ्या प्रमाणात इनकमिंग होणार असल्याचे सूतोवाच त्यांनी दिले आहेत. ते म्हणाले, अजितदादांकडेसुद्धा अनेकजण येणार आहेत. कारण, आता शरद पवार गटाला कंटाळले आहेत. त्या गटात चाललेली हुकूमशाही, मीपणा आणि अहंभाव यामुळे आमदार कंटाळले. ते अजित दादांच्या संपर्कात आहेत.

राज्यातील आगामी विधानसभा निवडणूक प्रचंड चर्चेची आणि हायवोल्टेज राहणार आहे. त्यामुळे कोणत्या पक्षात कोण जाणार याकडे सर्वांचे लक्ष आहे.

शरद पवारांच्या राष्ट्रवादीला मोठा धक्का, सोनिया दुहान अजिदादांच्या राष्ट्रवादीच्या वाटेवर?

मुंबई । वृत्तसंस्था

शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या युवकचे राष्ट्रीय अध्यक्ष धीरज शर्मा यांच्या पाठोपाठ युवतीच्या राष्ट्रीय अध्यक्षा सोनिया दुहान देखील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाटेवर असल्याचे बोलले जात आहे. धीरज शर्मा यांच्यासोबत सोनिया दुहान देखील उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. संपूर्ण लोकसभा निवडणुकीत धीरज शर्मा आणि सोनिया दुहान यांनी पक्षापासून अंतर राखल्याची चर्चा होती. आता मुंबईतील गरवारे क्लब येथे सोमवारी पक्षप्रवेश होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

कोण आहेत सोनिया दुहान ?

सोनिया दुहान या शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे राष्ट्रीय पातळीवर नेतृत्व करत होत्या. पक्षाच्या प्रवक्त्या म्हणूनही त्यांनी राष्ट्रीय पातळीवर काम केले आहे. पुण्यात शिक्षणासाठी आल्यानंतर त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये त्या सक्रिय झाल्या होत्या. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर अजित पवारांनी देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत जात उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यावेळी त्या चर्चेत आल्या होत्या. सोनिया दुहान यांनी हॉटेलमध्ये जात अजित पवारांसोबत गेलेल्या आमदारांना बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले होते.

८ तासांपूर्वी फेसबुक पोस्टच्या माध्यमातून सोनिया दुहान यांच्याकडून इंडिया आघाडीला मतदान करण्याचे आवाहन करण्यात आलं होतं. लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात हरियाणातील सर्व मतदारांना सांगू इच्छिते की, मतदानाचा हक्क बजावा. स्वत:ही इंडिया आघाडीला मतदान करा. शिवाय आपल्या कुटुंबियांनाही इंडिया आघाडीला मतदान करण्यास सांगा. देशात लोकशाही आणि संविधान शाबूत ठेवण्यासाठी ही शेवटची संधी आहे.

धीरज शर्मांकडून पक्षाच्या सर्व पदांचा राजीनामा

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट युवक आघाडीचे अध्यक्ष धीरज शर्मा यांची पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे. धीरज शर्मा यांनी पक्षाच्या सर्व पदांचा राजीनामा दिला आहे. फेसबुकवर पोस्ट करून त्यांनी याबाबतची माहिती दिली आहे.

विधीलिखित

सुरेशराव बोरकर,
ब्रह्मांड ज्योतिष कार्यालय, रावेर.
मो. : ९८५००१५५५८

सोमवार, दि. २७ मे २०२४

-*-*-* दैनंदिन राशिभविष्य *-*-*-

मेष – नवीन कार्यास सुरवात करावा.
वृषभ – पाव्हणे मंडळी विरोधात जाण्याची संभावना.
मिथुन – प्रवास करत असाल तर तब्येतीस सांभाळावे.
कर्क – शारीरीक अस्वस्थतता शक्यता आहे.
सिंह – नवीन कार्याच्या संधी प्राप्त होतील.
कन्या – कौटुंबीक मांगलीक कार्यात भाग घ्याल.
तूळ – नौकरी इच्छुकांना नौकरीच्या लाभ मिळेल.
वृश्चिक – हाती पैसा भरपूर खेळेल.
धनू – मन उत्साहीत राहणार आहे.
मकर – मनावर नियंत्रण ठेवूनच कार्य करावे.
कुंभ – उत्तमातील उत्तम कार्य ठरणार आहे.
मीन – वडिलोपार्जित घटना आठवतील.

टी-२० वर्ल्डकपसाठी भारतीय संघ झाला रवाना

मुंबई । वृत्तसंस्था

भारतीय क्रिकेट संघ आयसीसी टी-२० वर्ल्डकपसाठी रवाना झाला आहे. बीसीसीआयने टीम इंडियाला शुभेच्छासह या मेगा इव्हेंटसाठी रवाना केले. टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा आणि कोचसह खेळाडू वेस्ट इंडिज आणि अमेरिका क्रिकेट बोर्डाच्या यजमानपदाखाली खेळवल्या जाणाऱ्या स्पर्धेसाठी उड्डाण केले. मुंबईमधून भारतीय संघ वर्ल्ड चॅम्पियन बनण्याचे स्वप्न घेऊन गेली.

आयीसीसी टी-२० वर्ल्डकप जिंकण्याचे स्वप्न घेऊन भारतीय संघ शनिवारी २५ मेला रवाना झाला. बीसीसीआयने टीम इंडियाचे खेळाडू या बहुचर्चित स्पर्धेसाठी रवाना झाल्याची माहिती दिली. टीम बससमधून कर्णधार रोहित शर्मा, कोच राहुल द्रविड आणि ऑलराऊंडर रवींद्र जडेजा यांचा उतरण्याचा व्हिडिओ समोर आला आहे. मुंबई एअरपोर्ट येथून टीमने उड्डाण केले. १ ते २९ जूनदरम्यान आयसीसी क्रिकेट वर्ल्डकप खेळवला जाणार आहे.

कर्णधार रोहितसोबत कोण कोण एअरपोर्टचा जो फोटो समोर आला आहे त्यात कर्णधार रोहित शर्मा, विकेटकीपर ऋषभ पंत, कुलदीप यादव, रवींद्र जडेजा, शिवम दुबे, जसप्रीत बुमराह दिसले. तर अर्शदीप सिंह, मोहम्मद सिराज आणि अक्षर पटेल एकत्र दिसले.

भारतीय संघाचा कार्यक्रम

भारताला ग्रुप एमध्ये पाकिस्तान, कॅनडा, आयर्लंड आणि अमेरिकेसोबत ठेवण्यात आले आहे. आयसीसी टी-२० वर्ल्डकपची सुरूवात ५ जूनला आयर्लंडविरुद्ध होणार आहे. दुसऱ्या सामन्यात भारताचा सामना पाकिस्तानशी ९ जूनला होणार आहे. १२ तारखेला भारताचा सामना अमेरिकेशी होणार आहे. १५ जूनला भारताचा सामना कॅनडाच्या संघाशी होणार आहे.

भारतीय संघ – रोहित शर्मा (कर्णधार), हार्दिक पांड्या (उपकर्णधार), यशस्वी जायसवाल, विराट कोहली, सूर्यकुमार यादव, ऋषभ पंत (विकेटकीपर), संजू सॅमसन (विकेटकीपर), शिवम दुबे, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, युझवेंद्र चहल, अर्शदीप सिंह, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज.

काश्मिरात लवकरच विधानसभा निवडणूक

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

केंद्रशासित प्रदेश असणाऱ्या जम्मू आणि काश्मीरमध्ये विधानसभा निवडणूक घेण्याच्या दृष्टीने लवकरच प्रक्रिया सुरू करण्यात येईल, अशी हमी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी शनिवारी दिली. जम्मू आणि काश्मीरमधील नागरिकांना आपले सरकार निवडण्याचा अधिकार आहे, असेही ते म्हणाले.

सध्या सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीत जम्मू आणि काश्मीरमधील बहुतांश मतदारसंघात लक्षणीय प्रमाणात मतदान झाले. या पार्श्वभूमीवर तेथे विधानसभा निवडणूक कधी घेतली जाईल, अशी विचारणा पत्रकारांनी केली असता राजीव यांनी हे उत्तर दिले. जम्मू आणि काश्मीरमधील तरुण, महिला आदी सर्वजण अतिशय उत्साहाने मोठ्या संख्येने मतदानाला बाहेर पडले. तेथे लोकसहभाग वाढत आहे. लोकशाहीची मूळे आणखी खोलवर रूजत आहेत. त्यामुळे त्यांना आपले सरकार निवडण्याचा अधिकार आहे. त्यासाठी ते पात्र आहेत. तेथे विधानसभा निवडणूक घेण्याच्या दृष्टीने आवश्यक प्रक्रिया लवकरच सुरू केली जाईल, असे ते म्हणाले.

देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करुन देशदूत कार्यालय, अमर चित्र मंदिर चौक, नंदुरबार-४२५४१२ येथे प्रसिध्द केले. ● **व्यवस्थापकीय संपादक : विक्रम सारडा.** ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने*. फोन नं.**: नंदुरबार-२२११०१, जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४, धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४. **RNI.No. 69123/1998.** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)